RNI. REG. NO. MAHBIL/2023/86118
लोकरक्षणाय
LOKRAKSHANAY
सह संपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ

www.lokrakshanay.com ■ epaper.lokrakshanay.com ■ dainiklokrakshanay@gmail.com ■ @dainiklokrakshanay ■ +91 97023 86118

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

■ वर्ष ०४ ■ अंक ११८ ■ ठाणे ■ मंगळवार, दि. २८ जुलै २०२६ ■ पृष्ठे ८ ■ मूल्य २ रूपये

धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा : संविधान...



पान ५ वर

## थोडक्यात

### लाडकी बहीण ई-केवायसीला ६ महिन्यांची मुदतवाढ!

**मुंबई :** मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांसाठी महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी महत्त्वाची घोषणा करत ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती दिली आहे. ई-केवायसी अपूर्ण राहिल्यामुळे किंवा कागदपत्रांतील त्रुटी व तांत्रिक अडचणींमुळे योजनेचा हप्ता न मिळालेल्या, मात्र पात्र असलेल्या महिलांना यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. संबंधित महिलांनी या कालावधीत आवश्यक दुरुस्त्या करून ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहनही त्यांनी केले. सरकार मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना प्रभावीपणे राबविण्यास कटिबद्ध असून, पात्र असलेल्या कोणत्याही महिलेवर अन्याय होऊ नये यासाठी प्रशासनाकडून आवश्यक उपाययोजना करण्यात येत असल्याचे तटकरे यांनी स्पष्ट केले.

### माधुरी हत्तीच्या घरवापसीसाठी लाक्षणिक उपोषण

**कोल्हापूर :** नांदणी (ता. शिरोळ) मठाची परंपरा आणि श्रद्धेचे प्रतीक असलेल्या 'माधुरी' हत्तीच्या घरवापसीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे २८ जुलै रोजी नांदणी येथे एकदिवसीय लाक्षणिक उपोषणाचे आयोजन करण्यात आले आहे. या आंदोलनाचे नेतृत्व संघटनेचे संस्थापक तथा माजी खासदार राजू शेट्टी करणार असून, प्रशासनाच्या दिरंगाईविरोधात एल्गार पुकारण्यात आला आहे. संघटनेने प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार, गुजरातमधील जामनगर येथील वनतारा प्रकल्पात माधुरी हत्तीला हलवून २८ जुलै रोजी एक वर्ष पूर्ण होत आहे. उद्योगपतींच्या आग्रहाखातर नियम, कायदे आणि न्यायव्यवस्थेची पायमल्ली करून २८ जुलै २०२५ रोजी माधुरीला नांदणी मठातून हलविण्यात आल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

# कारगिल विजय दिवस आपल्यासाठी राष्ट्रनिष्ठा, शौर्य आणि बलिदानाचा प्रेरणादायी संदेश – राज्यपाल जिष्णु देव वर्मा

**● मुंबई, सुचित शिंदे :**

कारगिल विजय दिवस हा केवळ लष्करी विजयाचा स्मृतिदिन नसून भारतीय सैनिकांच्या अदम्य शौर्य, त्याग, शिस्त आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक आहे. या दिवसातून प्रत्येक नागरिकाने 'राष्ट्र प्रथम' हा आदर्श आपल्या जीवनात अंगीकारून एकसंघ, सक्षम आणि विकसित भारताच्या निर्मितीसाठी योगदान द्यावे, असे आवाहन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले. लोकभवन येथे सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित कारगिल विजय दिवसानिमित्त वीरसैनिक, माजी सैनिक, वीरमाता, वीरपत्नी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या कृतज्ञता सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री शंभूराज देसाई, व्हॉईस ॲडमिरल संजय वात्सायन, लेफ्टनंट जनरल डी एस





कुशवाह, पोलीस महासंचालक सदानंद दाते, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे, तिन्ही दलांचे वरिष्ठ अधिकारी तसेच वीर सैनिक, वीरमाता, वीरपत्नी, कुटुंबीय उपस्थित होते. राज्यपाल जिष्णु देव वर्मा म्हणाले की, कारगिल युद्धात दुर्गम पर्वतरांगांमध्ये, प्रतिकूल हवामानात आणि शत्रूच्या सततच्या माऱ्यात भारतीय सैनिकांनी दाखविलेल्या पराक्रमामुळे राष्ट्राची अखंडता अबाधित राहिली. भारताच्या सीमा केवळ शस्त्रांच्या बळावर नव्हे, तर सैनिकांच्या अदम्य साहस, शिस्त आणि राष्ट्रप्रेमाच्या बळावर सुरक्षित आहेत, असे त्यांनी नमूद केले. कारगिलमधील प्रत्येक शहीदामागे एक वीरमाता, वीरनारी आणि राष्ट्रासाठी सर्वोच्च त्याग करणारे कुटुंब उभे आहे. अशा कुटुंबांप्रती संपूर्ण राष्ट्र कृतज्ञ असून त्यांच्या सन्मानासाठी आणि कल्याणासाठी समाजाने सातत्याने सहभागी व्हावे आणि नव्या पिढीने कारगिल युद्धाचा इतिहास जाणून घेत भारतीय सशस्त्र दलांच्या समर्पणाची जाणीव ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले. वीरमाता आणि वीरपत्नींना समर्पित ऐतिहासिक देशभक्तिपर रचनेचे लोकार्पण हा अभिमानाचा क्षण असल्याचे सांगत राज्यपालांनी भारतीय स्थलसेना, नौदल आणि वायुसेनेच्या नेतृत्वासह सर्व सैनिकांच्या राष्ट्ररक्षणातील अतुलनीय योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.


● पान २ वर

# गारगाई धरण प्रकल्पाच्या कामांना गती द्यावी – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**● मुंबई, विशाल कारंडे :**

पालघर जिल्ह्यातील देवळी परिसरात होत असलेल्या गारगाई प्रकल्पामुळे मुंबई शहराच्या पाणी उपलब्धतेमध्ये वाढ होणार आहे. या प्रकल्पाशी संबंधित पुनर्वसन, वनीकरण आणि उभारणीसाठी संबंधित कामांना गती देण्यात यावी असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली गारगाई जलसिंचन प्रकल्प आढावा बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वन मंत्री गणेश



नाईक, अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, प्रधान सचिव एकनाथ डवले यासह वन विभाग आणि नगर विकास विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुंबईच्या भविष्यातील पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या गारगाई धरण प्रकल्पाच्या उभारणीला गती देण्यात आली असून, मे २०२९ पर्यंत प्रकल्प कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. गारगाई धरण प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई महानगर क्षेत्राच्या दीर्घकालीन पाणीपुरवठ्याला बळकटी मिळण्यास मदत होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**गारगाई धरण प्रकल्पाला गती; मे २०२९ पर्यंत कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट**


६५८ हेक्टर बुडीत क्षेत्रात वन जमीन जात असल्याने १४०० हेक्टर जमीन पुनर्वसनासाठी उपलब्ध करून दिली जाणार आहे. तसेच बुडीत वन क्षेत्रासाठी वन विकासासाठी वन विभागाला राज्यातील विविध जिल्ह्यात जमीन देण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ८४४ हेक्टर जमीन बाधित होणार असून,

● पान २ वर

# धर्मेंद्र प्रधानांनंतर नितीन गडकरी विरोधकांच्या निशाण्यावर?

**● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर आता केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनाही इथेनॉल धोरणाच्या मुद्द्यावर विरोधकांनी लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे. शिवाजी पार्क येथे आयोजित तिरंगा रॅलीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात नितीन गडकरी यांच्यावर जोरदार टीका केली. त्यांनी गडकरी यांचा उल्लेख 'खड्डे मंत्री' आणि 'टोलाकारी



गडकरी' असा करत इथेनॉल धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ठाकरे म्हणाले की, केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री इथेनॉलचा पुरस्कार करत आहेत आणि हा पुढील मोठा सार्वजनिक चर्चेचा विषय ठरणार आहे. याच भाषणात त्यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यावरही टीका केली. ठाकरे यांच्या वक्तव्यातून आगामी काळात

**उद्धव ठाकरे, हर्षवर्धन सपकाळ यांची केंद्रीय मंत्रिपदाच्या राजीनाम्याची मागणी**

केंद्र सरकारच्या काही प्रमुख मंत्र्यांना विरोधकांकडून विविध मुद्द्यांवर लक्ष्य केले जाण्याचे संकेत मिळाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. दरम्यान, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही इथेनॉल धोरणावरून नितीन गडकरी यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

● पान २ वर

# महापुराच्या फटक्यानंतर अवघ्या तीन दिवसांत डहाणू-बोर्डी मार्ग वाहतुकीसाठी खुला

**● पालघर, सुचिता सोनावणे :**

पालघर जिल्ह्यात, विशेषतः डहाणू आणि तलासरी तालुक्यात २२ व २३ जुलै रोजी झालेल्या ढगफुटीसदृश मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या अतिवृष्टीमुळे डहाणू ते बोर्डी दरम्यान सुमारे १६० मीटर लांबीचा रस्ता वाहून गेल्याने बोर्डी–चिखला–नरपड मार्गे डहाणू या महत्त्वाच्या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. डहाणू तालुक्यात २३ जुलै रोजी २५० मिलिमीटरपेक्षा



अधिक, तर तलासरी तालुक्यात ५६० मिलिमीटर पावसाची नोंद झाली. या मुसळधार पावसामुळे झाई–बोर्डी–रेवस–रेड्डी या प्रमुख राज्य मार्ग क्रमांक ४ वरील नरपड-आंबेवाडी परिसरात सुमारे ६० मीटर लांबीचे दोन रस्त्याचे पट्टे पूर्णपणे उखडून गेले. तसेच चिखला-नवाखाडी येथे मातीचा बंधारा फुटल्याने समुद्राच्या भरतीचे पाणी आणि डोंगरातून

**पालघर प्रशासनाची विक्रमी कामगिरी!**

आलेल्या पावसाच्या पाण्यामुळे सुमारे ४० मीटर लांबीचा रस्ता आणि भराव वाहून गेला. त्यामुळे या परिसरातील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखड यांनी मंत्रालय स्तरावर तातडीने पाठपुरावा करून रस्ता दुरुस्तीसाठी आवश्यक मंजुरी मिळवली. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता महेंद्र किणी, शाखा अभियंता राजेश उमतोल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ठेकेदारांच्या मदतीने २४ जुलैपासून युद्धपातळीवर काम सुरू केले.

अवघ्या तीन दिवसांत रस्त्यावरील वाहतूक पूर्ववत करण्यात प्रशासनाला यश आले.

या दुरुस्तीच्या कामासाठी तीन पोकलँड, चार उत्खनक, ४० हून अधिक हायवा डंपर, आठ काँक्रीट मिक्सर आणि मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाचा वापर करण्यात आला.

● पान २ वर

# इन्स्टाग्रामवर 'रिझर्व्हेशन हटाओ आंदोलन' व्हायरल





**आरक्षणाच्या मुद्द्यावरून सोशल मीडियात पुन्हा पेटली ठिणगी**

**● मुंबई, विशाल पाटील :**

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इन्स्टाग्रामवर 'रिझर्व्हेशन हटाओ आंदोलन' (Reservation Hatao Andolan – RHA) या नावाने सुरू झालेली डिजिटल मोहीम अल्पावधीतच मोठ्या प्रमाणावर चर्चेत आली आहे. विविध सोशल मीडिया पोस्टनुसार, अवघ्या २४ ते ४८ तासांत या मोहिमेच्या इन्स्टाग्राम पेजला ३९ लाखांहून अधिक फॉलोअर्स मिळाल्याचा दावा करण्यात येत आहे. यापूर्वी सोशल मीडियावर चर्चेत आलेल्या 'कॉक्रोच जनता पार्टी' या डिजिटल मोहिमेनंतर आता आरक्षणाच्या मुद्द्यावर ही नवी ऑनलाइन मोहीम चर्चेचा विषय ठरली आहे. @reservationhataomovement या नावाने चालणाऱ्या इन्स्टाग्राम पेजवर शिक्षण आणि नोकऱ्यांमधील आरक्षणाबाबत विविध भूमिका मांडण्यात येत आहेत. या मोहिमेच्या पोस्टनुसार, शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये निवड केवळ गुणवत्ता (मेरिट) आणि कौशल्याच्या आधारावर व्हावी, सर्व नागरिकांना जात न पाहता समान संधी मिळावी, आरक्षणाचा लाभ केवळ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाच मिळावा आणि सरकारी कागदपत्रांमध्ये तसेच सार्वजनिक व्यवहारांमध्ये जातीचा उल्लेख टप्प्याटप्प्याने बंद करण्यात यावा, अशा प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या आहेत. "एक देश, एक ओळख – भारतीय" ही या मोहिमेची प्रमुख संकल्पना असल्याचेही संबंधित पेजवर नमूद करण्यात आले आहे. या आंदोलनाचे कोणतेही अधिकृत संस्थापक किंवा प्रमुख नेतृत्व अद्याप सार्वजनिकपणे समोर आलेले नसून, ही राजकीय पक्षांपासून स्वतंत्र आणि तरुणांनी चालवलेली नागरिकांची सोशल मीडिया मोहीम असल्याचा दावा संबंधित पेजकडून करण्यात आला आहे.

● पान २ वर

# ७.४७ लाख वारकऱ्यांची माऊलीप्रमाणे काळजी

**मोफत आरोग्य सेवेला भाविकांचा उदंड प्रतिसाद**

**● पंढरपूर, शकील शेख :**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार तसेच सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी वारी २०२६ दरम्यान सार्वजनिक आरोग्य विभागाने वारकरी भाविकांसाठी व्यापक, दर्जेदार आणि तातडीच्या आरोग्य



सेवांची प्रभावी अंमलबजावणी केली. 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत तब्बल ७ लाख ४७ हजार १७८ वारकरी भाविकांना मोफत आरोग्य सेवा देण्यात आली.

● पान २ वर

# 'नशामुक्त मुंबई' अभियानात सर्वांचा सहभाग महत्वाचा – मंत्री मंगलप्रभात लोढा

**मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ३० जुलै रोजी शुभारंभ**

**● मुंबई, राकेश गायकवाड :**

'नशामुक्त मुंबई' अभियानाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते येत्या गुरुवारी होणार आहे. हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नसून, वाढत्या अमली पदार्थांच्या विळख्यातून तरुण पिढीला वाचवण्यासाठी ते सातत्याने चालणारे लोकशिक्षणाचे आणि सार्वजनिक हिताचे अभियान आहे. या जनचळवळीत समाजातील सर्व घटकांनी आणि विशेषतः विद्यार्थी, शिक्षक व पालकांना सहभागी करून घ्यावे, असे प्रतिपादन कौशल्य विकास मंत्री आणि मुंबई उपनगर जिल्ह्याचे



सह पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले.30 जुलै रोजी वरळी डोम येथे 'नशामुक्त मुंबई' अभियानाचा शुभारंभ होत असून, त्या पार्श्वभूमीवर आयोजित पूर्वतयारीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल (ऑनलाइन) यांच्यासह बृहन्मुंबई महानगरपालिका, शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, बृहन्मुंबईतील विविध यंत्रणांचे अधिकारी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. बैठकीत मंत्री मंगलप्रभात लोढा आणि जिल्हाधिकारी कटियार यांनी संबंधित यंत्रणांना या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि आयोजनासाठी काटेकोर सूचना दिल्या.

● पान २ वर

# बदलते महासत्तांचे समीकरण

जागतिक राजकारणात गेल्या काही वर्षांत घडलेल्या घटनांनी पारंपरिक महासत्तांच्या वर्चस्वाबाबत अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. युक्रेन आणि इराणमधील संघर्षांनी अमेरिका आणि रशिया या दोन्ही देशांच्या सामरिक प्रभावाला अपेक्षेपेक्षा मोठे आव्हान दिले आहे. विशेषतः इराणने अमेरिकेसमोर दिलेला दीर्घ आणि ठाम प्रतिकार चीनच्या राजनैतिक व धोरणात्मक पाठिंब्याशिवाय शक्य झाला नसता, असे मानले जाते. या पार्श्वभूमीवर भविष्यातील जागतिक सत्ता-संतुलन हे केवळ दोन महासत्तांभोवती फिरणारे न राहता बहुध्रुवीय स्वरूप धारण करेल, अशी चिन्हे दिसू लागली आहेत. या नव्या व्यवस्थेत चीनबरोबरच भारताचाही प्रभावी शक्ती म्हणून उदय होण्याची शक्यता अधिक ठळक होत आहे.

अमेरिका आणि रशिया या दोन्ही देशांनी आपल्या धोरणात्मक निर्णयांमुळे स्वतःलाच दीर्घकालीन संघर्षांच्या भोवऱ्यात अडकवून घेतले आहे. युक्रेन आणि इराणमधील युद्धांनी हे स्पष्ट केले आहे की, महासत्तांचा प्रभाव आता पूर्वीसारखा निर्विवाद राहिलेला नाही. जागतिक व्यवस्था हळूहळू विकेंद्रित होत असून विविध प्रादेशिक शक्ती अधिक प्रभावी बनत आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणातील सत्ता-संतुलन नव्या टप्प्यात प्रवेश करत असल्याचे चित्र दिसते.

इतिहासाकडे पाहिले तर जगाने दोन महायुद्धे, शीतयुद्धाचा प्रदीर्घ काळ, विविध द्विपक्षीय संघर्ष आणि महासत्तांमधील अप्रत्यक्ष लढाया अनुभवल्या आहेत. प्रत्येक संघर्षाने जागतिक व्यवस्थेला नवे धडे दिले. अनेक आंतरराष्ट्रीय संस्था, करार आणि संवादाच्या यंत्रणा याच अनुभवांतून निर्माण झाल्या. जागतिकीकरणामुळे राष्ट्रांमधील आर्थिक आणि व्यापारी परस्परावलंबित्व वाढले, तर दुसरीकडे राष्ट्रीय हितसंबंधांना अग्रक्रम देणारा राष्ट्रवादही अधिक प्रभावी झाला. या बदलांमुळे संघर्ष टाळण्यासाठी बहुपक्षीय संवादाला अधिक महत्त्व प्राप्त झाले.

एक काळ असा होता की, आर्थिक परस्परावलंबित्वामुळे पारंपरिक युद्धांची आवश्यकता कमी होत असल्याची चर्चा जागतिक स्तरावर सुरू झाली होती. काही अभ्यासकांनी भविष्यात मोठ्या लष्करी संघर्षांचे महत्त्व संपुष्टात येईल, असेही मत व्यक्त केले होते. मात्र गेल्या काही वर्षांतील घटनांनी हा समज चुकीचा ठरवला. अझरबैजान आणि आर्मेनिया यांच्यातील युद्धाने आधुनिक जगातही पारंपरिक संघर्ष संपलेले नाहीत, हे दाखवून दिले. त्यानंतर रशियाने युक्रेनवर लष्करी कारवाई सुरू केली आणि जागतिक राजकारण पुन्हा एका मोठ्या संघर्षाच्या टप्प्यात पोहोचले.

युक्रेनमधील युद्ध तीन वर्षांहून अधिक काळ सुरू असतानाच २०२६ च्या प्रारंभी अमेरिका आणि इस्रायलने इराणविरुद्ध आखातात लष्करी कारवाई सुरू केली. हे दोन्ही संघर्ष आजही सुरू आहेत. दोन्ही महासत्तांचे नेते सार्वजनिकरीत्या विजयाचे दावे करत असले, तरी प्रत्यक्ष परिस्थिती त्याला पूर्णतः दुजोरा देत नाही. उलट या संघर्षांमुळे अमेरिका आणि रशिया या दोन्ही देशांच्या जागतिक महत्त्वाकांक्षांना मर्यादा आल्याचे चित्र दिसून येते.

फेब्रुवारी २०२२ मध्ये रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी अल्पकालीन 'विशेष लष्करी मोहिमे'च्या माध्यमातून युक्रेनवर सहज नियंत्रण मिळवता येईल, असा अंदाज व्यक्त केला होता. मात्र युक्रेनने कठोर प्रतिकार करून हा अंदाज चुकीचा ठरवला. त्याचप्रमाणे फेब्रुवारी २०२६ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणविरुद्ध आक्रमक भूमिका घेतली. त्यांनाही जलद विजयाची अपेक्षा होती; परंतु प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी ठरली.

युक्रेनकडे होर्मुझ सामुद्रधुनीसारखे जागतिक व्यापारासाठी महत्त्वाचे स्थान नसतानाही त्यांनी जगातील एका बलाढ्य महासत्तेला दीर्घकाळ युद्धात अडकवून ठेवले. सलग तीन वर्षांपेक्षा अधिक काळ सुरू असलेल्या संघर्षामुळे रशियाच्या लष्करी सामर्थ्याविषयीची पारंपरिक प्रतिमा कमकुवत झाली आहे. अध्यक्ष पुतीन यांच्या नेतृत्वाभोवती निर्माण झालेले अजेयतेचे वलयही कमी झाले आहे. जून २०२६ च्या अखेरीस त्यांनी रशिया अत्यंत कठीण आणि निर्णायक टप्प्यातून जात असल्याचे केलेले विधान या परिस्थितीचेच द्योतक मानले जाते.

या युद्धात युक्रेनने वापरलेले आधुनिक युद्धतंत्र रशियासाठी मोठे आव्हान ठरले आहे. तुलनेने कमी किमतीच्या ड्रोनच्या साहाय्याने युक्रेनने रशियाच्या अत्यंत महागड्या रणगाड्यांना, क्षेपणास्त्र प्रणालींना आणि लष्करी तळांना लक्ष्य केले. एवढेच नव्हे, तर मॉस्कोपर्यंत पोहोचलेल्या ड्रोन हल्ल्यांमुळे तेल शुद्धीकरण प्रकल्पांनाही फटका बसला. परिणामी रशियाच्या ऊर्जा उत्पादनावर आणि अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणाम झाला. २०२२ मध्ये रशियाने ताब्यात घेतलेल्या भूभागातील काही भाग युक्रेनने पुन्हा आपल्या नियंत्रणाखाली आणला असून, २०१४ मध्ये रशियाने ताब्यात घेतलेल्या क्रिमियाच्या भवितव्याबाबतही नव्या घडामोडी घडताना दिसत आहेत.

इराणविरुद्ध सुरू करण्यात आलेल्या 'ऑपरेशन एपिक फ्युरी'वेळी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या नेतृत्वावर निर्णायक दबाव आणल्यास तेथील सरकार कोसळेल आणि युद्ध लवकर संपेल, असा अंदाज व्यक्त केला होता.

मात्र हा अंदाज प्रत्यक्षात खरा ठरला नाही. उलट इराणने दीर्घकाळ प्रतिकार कायम ठेवत अमेरिकेला अनेक स्तरांवर कठीण आव्हान दिले.

या संघर्षाचा निश्चित निकाल लागलेला नसल्याने अमेरिकेच्या लष्करी सामर्थ्याबरोबरच तिच्या धोरणात्मक निर्णयक्षमतेवरही प्रश्न उपस्थित झाले आहेत. ट्रम्प यांनी युक्रेनमधील युद्ध अल्पावधीत संपवण्याचे आश्वासन दिले होते; परंतु ते प्रत्यक्षात पूर्ण होऊ शकले नाही. त्यानंतर इराणमधील संघर्ष अपेक्षेप्रमाणे हाताळण्यात आलेल्या अडचणींमुळे अमेरिकेच्या जागतिक नेतृत्वक्षमतेबाबतही चर्चा सुरू झाली आहे. विविध स्वतंत्र अहवाल आणि 'इराण वॉर कॉस्ट ट्रॅकर'मधील आकडेवारीनुसार, २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सुरू झालेल्या या युद्धावर जून २०२६ च्या मध्यापर्यंत अमेरिकेचा सुमारे ११३.३ अब्ज डॉलर्स खर्च झाला. या खर्चात लष्करी मोहिमा, सैनिकांची तैनाती, शस्त्रास्त्रे तसेच युद्धामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई यांचा समावेश आहे. प्रत्यक्ष खर्च मात्र अधिकृत अंदाजापेक्षा अधिक असल्याचे विविध अभ्यासांतून सूचित केले जात आहे.

युक्रेन आणि इराणमधील संघर्षांनी जागतिक राजकारणाचा चेहरामोहरा बदलण्यास सुरुवात केली आहे. महासत्तांच्या प्रभावाला आता पूर्वीसारखी निर्विवाद धार राहिलेली नाही. पुढील काळात बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेला अधिक बळ मिळण्याची शक्यता असून चीनसह भारतासारख्या उदयोन्मुख शक्तींची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे. बदलत्या जागतिक समीकरणांमध्ये हीच नवी वास्तवता मान्य करावी लागणार आहे.

**- अनिकेत घनश्याम भंकाळ**

**संपादकीय**

# संवर्धनापलीकडे : जीवनजालातील जबाबदार सहजीवनाची वेळ आली आहे



**विजयकुमार कट्टी**

'संवर्धन' हा शब्द आपल्या सर्वांच्या परिचयाचा आहे. झाडे लावणे, वनांचे रक्षण करणे, जैवविविधतेचे जतन करणे, जलस्रोत वाचवणे आणि पर्यावरणाचे संरक्षण करणे—या सर्व कृती आपण संवर्धनाच्या नावाखाली करतो. गेल्या काही दशकांत या विचारामुळे समाजात पर्यावरणाविषयी जागरूकता वाढली, अनेक चळवळी उभ्या राहिल्या आणि निसर्गसंवर्धनाची सामूहिक भावना बळकट झाली. या प्रयत्नांचे महत्त्व आजही तितकेच आहे.

पण आज, जागतिक संवर्धन दिनाच्या निमित्ताने, स्वतःला एक वेगळा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे.केवळ संवर्धन पुरेसे आहे का? की आता संवर्धनापलीकडे जाऊन जीवनजालातील जबाबदार सहजीवन स्वीकारण्याची वेळ आली आहे?

उद्या सकाळी घराबाहेर पडताना आपल्या परिसरातील एखाद्या झाडाजवळ क्षणभर थांबा. ते झाड शांत दिसेल; पण त्याच्या शांततेत सृष्टीतील सर्वात मोठा संवाद सुरू असतो. जमिनीखाली त्याच्या मुळांभोवती सूक्ष्म बुरशींसोबत

## जागतिक संवर्धन दिनानिमित्त एक नवा विचार

अन्नद्रव्यांची देवाणघेवाण चालू असते. पाणी, माती, सूक्ष्मजीव, कीटक, पक्षी आणि सूर्यप्रकाश यांच्यातील अखंड सहकार्यामुळे त्या झाडाचे जीवन फुलत असते. या प्रक्रियांपैकी एकही प्रक्रिया मानवासाठी स्वतंत्रपणे घडत नाही. त्या घडतात कारण प्रत्येक सजीव जीवनजालातील स्वतःची भूमिका प्रामाणिकपणे पार पाडत असतो.

तरीही आपण झाडांविषयी बोलतो तेव्हा आपल्या चर्चेचा केंद्रबिंदू बहुतांश वेळा आपणच असतो. झाडे आपल्याला प्राणवायू देतात, कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात, सावली देतात, तापमान कमी करतात, पाणी धरून ठेवतात आणि आपल्या आरोग्याचे संरक्षण करतात—हे सर्व निर्विवाद सत्य आहे. परंतु या सत्यामागे एक न बोललेला समज दडलेला आहे. आपण नकळत असे मानू लागलो आहोत की वनस्पतीसृष्टीचे महत्त्व मुख्यतः मानवाच्या उपयोगामुळे आहे.

कदाचित आता आपला दृष्टिकोन बदलण्याची वेळ आली आहे.

वनस्पतीसृष्टी ही केवळ संसाधनांचा साठा नाही. ती अब्जावधी वर्षांच्या उत्क्रांतीतून घडलेली सजीव नात्यांची अखंड व्यवस्था आहे. झाडे बुरशींना आधार देतात, बुरशी मुळांना बळकटी देते, मुळे सूक्ष्मजीवांना पोषण देतात, कीटक परागीभवन घडवून आणतात, पक्षी बीजांचा प्रसार करतात, माती जीवनाला आधार देते आणि पाणी या संपूर्ण व्यवस्थेला एकत्र बांधून ठेवते. या जीवनजालातील प्रत्येक घटक दुसऱ्याचे अस्तित्व समृद्ध करतो. एक धागा तुटला तर संपूर्ण विण कमकुवत होऊ लागते.

या जीवनजालाबाहेर मानव कधीच नव्हता.आपण नेहमीच त्याचा अविभाज्य भाग होतो. म्हणूनच आता प्रश्न ''निसर्ग आपल्यासाठी काय करतो?''* हा राहिलेला नाही.

**खरा प्रश्न आहे— ''जीवनजालातील जबाबदार सहजीवन जगण्यासाठी आपण काय करणार आहोत?**

याच प्रश्नातून UFIPM™ (Urban Forest Intelligence & Preventive Management) Framework जन्माला आला आहे. हा केवळ झाडांचे मूल्यमापन करणारा आराखडा नाही; तर नागरिक, संशोधक, वृक्षतज्ज्ञ, प्रशासन, शैक्षणिक संस्था आणि जबाबदार कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्या सामूहिक सहभागातून शहरी वनपरिसंस्थेला समजून घेण्याचा एक नवा दृष्टिकोन आहे. संकट उद्भवल्यानंतर उपाय शोधण्याऐवजी, त्याची पूर्वचिन्हे ओळखून प्रतिबंधात्मक कृती करण्याची ही एक लोकसहभागावर आधारित कार्यपद्धती आहे.

या विचाराचा प्रवास एका कार्यक्रमाने संपणार नाही; तो संवादातून पुढे जाणार आहे. म्हणूनच जागतिक संवर्धन दिन,२८ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता, UFIPM™ Framework सार्वजनिकरित्या सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर २८ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत इच्छुक नागरिक, विद्यार्थी, संशोधक, वृक्षतज्ज्ञ, पर्यावरण अभ्यासक, शासकीय अधिकारी, नगररचनाकार, शिक्षक आणि माध्यम प्रतिनिधी यांच्यासाठी त्यांच्या सोयीच्या वेळेनुसार संवाद व प्रात्यक्षिक सत्रे आयोजित करण्यात येतील.

या उपक्रमात सहभागी होण्यासाठी किंवा आपल्या सोयीचा वेळ निश्चित करण्यासाठी +९१ ७९७७५१३८२२ या क्रमांकावर संपर्क साधावा. कारण भविष्यातील संवर्धनाची खरी ओळख आपण किती झाडे लावली यावर ठरणार नाही.ती ठरेल—आपण जीवनजालाशी किती जबाबदारीने सहजीवन जगलो यावर.कारण निसर्गाला आपल्या संरक्षणाची गरज नाही.गरज आहे ती—मानवाने स्वतःला जीवनजालातील जबाबदार सहजीवनाचा सहभागी म्हणून पुन्हा ओळखण्याची.

## पान १ वरुन

### कारगिल विजय दिवस आपल्यासाठी...

**कारगिल वीरांचे शौर्य भारताच्या इतिहासात अजरामर; शहीदांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी महाराष्ट्र शासन खंबीरपणे उभे – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

कारगिल युद्धातील भारतीय जवानांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत दाखविलेले शौर्य हे जगाच्या युद्धइतिहासातील अतुलनीय उदाहरण असून, भारताचा इतिहास जिवंत असेपर्यंत कारगिलचे वीर अजरामर राहतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

### गारगाई धरण प्रकल्पाच्या कामांना...

त्यामध्ये १८६ हेक्टर खासगी जमीन आणि ६५८ हेक्टर वनजमिनीचा समावेश आहे. प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात एकूण ८०५ हेक्टर जमीन येणार आहे.प्रकल्पामुळे ओगदा आणि खोडदे ही दोन गावे पूर्णतः, तर पाचघर, तिळमाळ, फणसगाव आणि आमले ही चार गावे अंशतः बाधित होणार आहेत.

या महत्वाकांक्षी प्रकल्पाचा अंदाजित खर्च ₹३,०६५ कोटी असून, त्यामध्ये धरण, जलबोगदा, पुनर्वसनासाठी आवश्यक २२ पायाभूत सुविधांची निर्मिती तसेच वीज निर्मिती संचाचा समावेश आहे. याशिवाय जमीन अधिग्रहण, पुनर्वसन, पर्यायी वनीकरण, वृक्षांचे निव्वळ वर्तमान मूल्य, सल्लागार सेवा आदी बाबींवरील खर्च कंत्राटी खर्चापेक्षा स्वतंत्रपणे करण्यात येणार आहे.

गारगाई धरण प्रकल्पासाठी आवश्यक परवानग्या प्राप्त होत असून केंद्रीय जनजातीय मंत्रालय (MOTA), राष्ट्रीय भूकंप संकल्पन मानक समिती यासह गारगाई धरण प्रकल्प संकल्पचित्र तांत्रिक मंजु-या आणि पर्यावरण परवानग्या प्राप्त झालेल्या आहेत. राष्ट्रीय वन्यजीव महामंडळाची मंजूरी साठी कार्यवाही करण्यात येत आहे.

यासंदर्भात पुनर्वसन आणि पर्यावरणीय उपाययोजनांवरही विशेष भर देण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

### महापुराच्या फटक्यानंतर अवघ्या तीन...

नरपड-आंबेवाडी परिसरात वाहून गेलेल्या रस्त्याच्या पुनर्बांधणीसाठी सुमारे ३०० डंपर डबर आणि २०० डंपर कपची-खडी वापरून भराव टाकण्यात आला. पाण्याचा योग्य निचरा व्हावा यासाठी १२ मीटर रुंद आणि १२०० मिलिमीटर व्यासाच्या सहा रांगांमध्ये पाईप बसवून मजबूत मोरी उभारण्यात आली. विशेष म्हणजे, २००२ मधील पूरस्थितीत याच भागातील रस्ता वाहून गेल्यानंतर ज्या पद्धतीने उपाययोजना करण्यात आल्या होत्या, त्याच धर्तीवर यावेळीही अत्यंत कमी वेळेत मजबूत रस्ता उभारण्यात आला. दरम्यान, चिखला-नवाखाडी येथे भरावासाठी आवश्यक साहित्य पोहोचविण्यासाठी कोणताही संपर्क रस्ता उपलब्ध नव्हता. मात्र नरपड येथील एका मार्गिकेचे काम पूर्ण होताच सार्वजनिक बांधकाम विभागाने तेथेही विक्रमी गतीने दुरुस्ती सुरू केली. या कामासाठी मनोर आणि किराट परिसरातून गौण खनिज साहित्य, तर वाडा येथून मोरीसाठी लागणारे ३० पाईप उपलब्ध करून देण्यात आले. नियोजनबद्ध काम, यंत्रसामग्रीचा प्रभावी वापर आणि प्रशासनाचा सातत्यपूर्ण पाठपुरावा यामुळे अशक्य वाटणारे हे काम अवघ्या काही दिवसांत पूर्ण झाले. वाहतूक पूर्ववत झाल्याने परिसरातील नागरिक, व्यापारी आणि वाहनचालकांनी समाधान व्यक्त केले असून, आपत्कालीन परिस्थितीत प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने दाखविलेल्या तत्परतेचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

### धर्मेंद्र प्रधानांनंतर नितीन गडकरी...

बुलढाणा येथे पत्रकारांशी बोलताना त्यांनी कथित 'इथेनॉल घोटाळा' असा उल्लेख करत, सामान्य वाहनधारकांच्या हिताशी तडजोड झाल्याचा आरोप केला. त्यांच्या मते, इथेनॉल-मिश्रित इंधनामुळे अनेक वाहनधारकांना वाहनांच्या कार्यक्षमतेबाबत अडचणींचा सामना करावा लागत आहे, तर इथेनॉल उत्पादक कंपन्यांना मोठा आर्थिक लाभ झाला आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी दावा केला की, केंद्र सरकारचे इथेनॉल धोरण हे भ्रष्टाचार आणि सर्वसामान्य नागरिकांच्या छळाचे उदाहरण असल्याचा त्यांचा आरोप आहे. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इथेनॉल-मिश्रित इंधनामुळे कथितरीत्या नुकसान झाल्याचा दावा करणाऱ्या वाहनधारकांची माफी मागावी, अशी मागणीही केली. तसेच, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर इथेनॉल धोरणासाठी जबाबदार असल्याचा आरोप करत नितीन गडकरी यांनीही नैतिक जबाबदारी स्वीकारून पदाचा राजीनामा द्यावा, असे ते म्हणाले. विरोधकांकडून ई-२० इथेनॉल-मिश्रण धोरणामुळे वाहनांचे मायलेज कमी होणे, इंजिनवर परिणाम होण्याची शक्यता तसेच हितसंबंधांचा संघर्ष असल्याचे आरोप करण्यात येत आहेत. मात्र, या आरोपांवर केंद्र सरकार किंवा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून या वृत्तानुसार कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही. इथेनॉल धोरणाबाबत सरकारचा यापूर्वीचा दावा असा आहे की, इंधन आयातीवरील अवलंबित्व कमी करणे, पर्यावरणपूरक इंधनाचा वापर वाढवणे आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अतिरिक्त बाजारपेठ उपलब्ध करून देणे हे या धोरणामागील प्रमुख उद्दिष्ट आहे. विरोधकांच्या टीकेनंतर इथेनॉल धोरणावरचा राजकीय वाद आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### ७.४७ लाख वारकऱ्यांची...

पालखी मार्ग तसेच पंढरपूर येथे उभारण्यात आलेल्या आरोग्य शिबिरांमधून ७ लाख ४२ हजार ७३१ बाह्यरुग्णांवर उपचार, ४ हजार ४४७ रुग्णांना आंतररुग्ण सेवा, तर १ हजार ६०० रुग्णांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले. वारीदरम्यान संसर्गजन्य आणि असंसर्गजन्य आजारांवरही मोठ्या प्रमाणात उपचार करण्यात आले. यामध्ये ४० हजार ९३३ तापाचे रुग्ण, ११ हजार ४८६ उच्च रक्तदाबाचे रुग्ण, ९ हजार ९७३ मधुमेहाचे रुग्ण, २३ हजार १०२ तीव्र श्वसन संसर्गाचे रुग्ण, १९ हजार ४७७ अतिसाराचे रुग्ण, ५ हजार ४५५ आमांशाचे रुग्ण, तसेच २१४ रस्ते अपघातग्रस्त, ५१ हृदयविकाराच्या झटक्याचे रुग्ण, ३६५ श्वानदंशाची प्रकरणे आणि १ सर्पदंशाचे प्रकरण यांच्यावर उपचार करण्यात आले. याशिवाय ३ क्षयरोगाचे रुग्ण आढळून आले असून इतर ६ लाख २९ हजार ६२९ रुग्णांनाही आवश्यक आरोग्य सेवा पुरविण्यात आली. वारकऱ्यांच्या सेवेसाठी पालखी मार्गावर ३५३ रुग्णवाहिका, ६९ सुसज्ज आयसीयू, १५६ 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना', २१५ आरोग्यदूत, ३,०८७ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी आणि ३०२ तज्ज्ञ डॉक्टर कार्यरत होते. याशिवाय प्रथमच एअर ॲम्बुलन्स सेवा, २४ तास आयसीयू सुविधा, महाआरोग्य शिबिर, मोफत चष्मा वाटप, पाणी स्रोतांचे निर्जंतुकीकरण, डेंग्यू-मलेरिया प्रतिबंधात्मक उपाययोजना, आरोग्य जनजागृती आणि डिजिटल मॅपिंग यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. या सर्व उपक्रमांमुळे वारकऱ्यांना सुरक्षित, सुलभ आणि वेळेवर आरोग्य सेवा मिळाल्याने वारी अधिक आरोग्यदायी आणि सुकर ठरली. आषाढी वारी २०२६ दरम्यान मुख्यमंत्री सचिवालय, मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष आणि सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित करण्यात आलेल्या 'आरोग्यसंपन्न वारी' वेब ॲपला वारकरी भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या वेब ॲपचा १ लाख ८ हजार ३८ वारकरी भाविकांनी लाभ घेतला असून, आवश्यक आरोग्य सेवा आणि इतर सुविधा सहज उपलब्ध झाल्यामुळे भाविकांनी समाधान व्यक्त केले. लाखो वारकऱ्यांना प्रवासादरम्यान सुरक्षित, सुलभ आणि तात्काळ आरोग्य सेवा मिळाव्यात या उद्देशाने विकसित करण्यात आलेल्या या वेब ॲपमध्ये रुग्णवाहिका सेवा, डॉक्टरांची माहिती, आरोग्य केंद्रे, 'आपला दवाखाना', पिण्याच्या पाण्याची ठिकाणे, स्वच्छतागृहे, मुक्काम व विसावा स्थळे तसेच महत्त्वाचे संपर्क क्रमांक यांसह विविध अत्यावश्यक सेवांची माहिती एका क्लिकवर उपलब्ध करून देण्यात आली होती. आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदत मिळावी, वारकऱ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि नियोजनबद्ध व्हावा तसेच आवश्यक आरोग्य सेवा वेळेत उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने हे वेब ॲप अत्यंत प्रभावी ठरले. वारीदरम्यान मोठ्या संख्येने भाविकांनी या डिजिटल सुविधेचा वापर करून विविध सेवांचा लाभ घेतला. राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक आरोग्य विभागाने पारंपरिक वारीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत आरोग्य व्यवस्थापन अधिक सक्षम केले असून 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' ही संकल्पना यशस्वीपणे साकार करत लाखो वारकऱ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित, सुकर आणि आरोग्यसंपन्न करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.

### 'नशामुक्त मुंबई' अभियानात सर्वांचा...

तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाईन आणि व्हॉट्सॲपच्या माध्यमातून लाखो नागरिकांना व्यसनमुक्तीची सामूहिक शपथ दिली जाणार असल्याचेही बैठकीत सांगण्यात आले.

**वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन**

नशामुक्त मुंबई अभियान हा केवळ एका दिवसाचा कार्यक्रम न ठेवता प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयात विद्यार्थी सुरक्षा समितीच्या माध्यमातून नशामुक्त मुंबई करण्यासाठी वर्षभर विविध उपक्रम राबविण्याचे नियोजन करावे. वरळी डोम येथील मुख्य कार्यक्रमासाठी येणाऱ्या विद्यार्थी, शिक्षक, पालक यांच्या उपस्थितीचे योग्य नियोजन करावे. यामध्ये प्रामुख्याने सातवीच्या पुढील शालेय तसेच महाविद्यालयांच्या आणि आयटीआयच्या विद्यार्थ्यांना, शिक्षकांना, पालकांना सहभागी करुन घ्यावे. या अभियानाला व्यापक स्वरूप देण्यासाठी व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, मानसोपचारतज्ज्ञ, राष्ट्रीय सेवा योजना, एनसीसीच्या विद्यार्थ्यांना या मोहिमेत सामावून घेतले जावे. इतर विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी मुंबईतील सर्व शाळा, महाविद्यालयांमधून कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात यावे, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या.

### इन्स्टाग्रामवर 'रिझर्व्हेशन हटाओ...

या मोहिमेत "सारी जाति एकसमान, मेरा बस ये देश महान" आणि "मेरिट हमारा हक है, कोटा नहीं" अशा घोषणा वापरण्यात येत असून, "शिका, आंदोलन करा आणि संघटित व्हा" हा संदेशही दिला जात आहे. दरम्यान, सोशल मीडियावर या मोहिमेबाबत संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. काही सामान्य प्रवर्गातील (General Category) तरुणांकडून या मोहिमेला पाठिंबा व्यक्त केला जात असून, गुणवत्ता-आधारित निवड प्रक्रियेची मागणी केली जात आहे. दुसरीकडे, अनेक बहुजन, अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) आणि इतर मागासवर्गीय (OBC) संघटनांशी संबंधित व्यक्तींनी या मोहिमेला विरोध दर्शविला आहे. त्यांच्या मते, आरक्षण ही भारतीय राज्यघटनेने दिलेली सामाजिक न्यायाची तरतूद असून, ऐतिहासिक आणि सामाजिक विषमता दूर करण्यासाठी ते आवश्यक आहे. त्यामुळे आरक्षण रद्द करण्याची मागणी मान्य होऊ शकत नाही, अशी भूमिका अनेकांनी समाजमाध्यमांवर व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावर आरक्षणाच्या विषयावर व्यापक चर्चा सुरू झाली असली, तरी या मोहिमेतील दावे, फॉलोअर्सची संख्या किंवा मागण्यांबाबत कोणतीही अधिकृत शासकीय भूमिका किंवा स्वतंत्र पडताळणी अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे या विषयाकडे सोशल मीडियावरील दावे आणि विविध मतप्रवाहांच्या संदर्भात पाहण्याची गरज असल्याचे निरीक्षकांचे मत आहे.

Printed, Published and Owned by Rakesh Shankar Gore and Printed at Somani Printing Press, Unit no.04, Ground Floor, N.K. Industrial Estate, off. Aarey Road, near Pravasi Ind. Estate, Gate no.2, Goregaon (east) Mumbai-400063, and Published at Shop no. १२, B-2, Sai Dham Shopping Center, Mangal Nagar,१५ No. Last Bus Stop, Near G.C.C. Club, Mira Road (east), Dist: Thane-401107, Maharashtra. Editor- Rakesh Shankar Gore. RNI REG. No: MAHBIL/2023/86118. Office Contact no. 9702386118, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Website: www.lokrakshanay.com (ठाणे न्याय कक्षेत)

# कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या टिटवाळा आरोग्य केंद्रातील महिला शौचालयाची दुरवस्था

**कल्याण (गणेश बागडे) :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या टिटवाळा आरोग्य केंद्रातील महिला सौचालयाची दयनीय अवस्था झाली असून गलिच्छ वातावरणात महिलांना त्याचा वापर करावा लागत आहे. एकीकडे नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा देण्याचे दावे केले जात असताना, दुसरीकडे कल्याण-डोंबिवली महानगरपालिका अंतर्गत मांडा पश्चिम येथील आयुष्मान आरोग्य मंदिर आरोग्य केंद्रातील महिला कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे समोर आले आहे.




जनताहित फाउंडेशन संस्थेचे अध्यक्ष रितेश कांबळे यांनी या आरोग्य केंद्राला प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली असता, मुख्य आरोग्य केंद्र स्वच्छ व व्यवस्थित असल्याचे दिसून आले. मात्र, महिला कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या शौचालय व स्नानगृहाची अवस्था अत्यंत दयनीय असल्याचे निदर्शनास आले. शौचालयाच्या दरवाज्याची दुरवस्था, परिसरातील अस्वच्छता आणि वापरण्यायोग्य सुविधा नसल्यामुळे महिला कर्मचाऱ्यांना नैसर्गिक विधीसाठी टिटवाळा रेल्वे स्थानकावरील सार्वजनिक शौचालयाचा आधार घ्यावा लागत असल्याची माहिती समोर आली. त्यामुळे महिलांची मोठ्या प्रमाणात कुचंबाना होत असून त्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे

याशिवाय आरोग्य केंद्रात पिण्याच्या पाण्याचीही नियमित व्यवस्था नसल्याचे आढळून आले. पाणीपुरवठ्याची पाइपलाइन उपलब्ध असली तरी पाणी सायंकाळी सुमारे ७ नंतर येत असल्याचे सांगण्यात आले. त्या वेळी कर्मचारी उपस्थित नसल्याने दिवसभरासाठी





पिण्याच्या पाण्याची अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्याची वेळ सकाळी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात येत आहे. रितेश कांबळे यांनी या परिस्थितीबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत "आरोग्य केंद्रात उपचार व स्वच्छतेची व्यवस्था चांगली असली तरी महिला कर्मचाऱ्यांसाठी शौचालय, स्नानगृह आणि पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध नसणे ही गंभीर बाब आहे. महिला कर्मचाऱ्यांना शौचालयासाठी रेल्वे स्थानकावर जावे लागणे हे त्यांच्या सन्मान, सुरक्षितता आणि आरोग्याच्या दृष्टीने योग्य नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने शौचालयाची दुरुस्ती, नवीन दरवाजा बसवणे, परिसराची स्वच्छता करणे आणि नियमित पाणीपुरवठ्याची व्यवस्था करावी."

स्थानिक नागरिकांनीही या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली आहे. केडीएमसी प्रशासनाने महिला कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज शौचालय, स्नानगृह तसेच नियमित पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था तातडीने करावी, अशी मागणी होत आहे.

आरोग्य सेवा देणाऱ्या केंद्रामध्ये उपचार व्यवस्था चांगली असली तरी कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध असणे तितकेच महत्त्वाचे आहे. या प्रश्नावर जनताहित फाउंडेशन ट्रस्टने संबंधित प्रशासनाकडे पत्रव्यवहार केला असून ही समस्या दूर व्हावी याकरिता पाठपुरावा करण्यात येणार आहे.

## आंबिवली–टिटवाळा मार्गावर एनआरसी कारखान्याची भिंत कोसळली

**टिटवाळा (प्रथमेश चव्हाण) :** आंबिवली–टिटवाळा मार्गावर रविवारी रात्री एन आर सी कारखान्याची भिंत कोसळून रिक्षा चालक जखमी झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. आंबिवली वरून बल्यानीकडे रिक्षात प्रवासी घेऊन जात असलेल्या रिक्षावर एनआरसी कारखान्याची संरक्षक भिंत अचानक कोसळल्याने रिक्षाचे मोठे नुकसान झाले. या दुर्घटनेत रिक्षाचालक भगवान रामचंद्र गोंधळे वय ४२ (मोहिली) हे जखमी झाले असून त्यांच्या हाताला गंभीर दुखापत झाली आहे. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी प्रशासनाने तातडीने पावले उचलणे गरजेचे आहे. या अगोदरही एनआरसी कॉलनी परिसरात विकास कॉलनी भागात येणार असे कारखान्याची भिंत कोसळून चार रिक्षांचे मोठे नुकसान झाले होते यावेळी एन आर सी कंपनी प्रशासनाने भिंतींची उंची कमी करून अर्ध्यावर आणली होती त्यामुळे अनेक अपघात थांबले आहेत. आंबिवली स्टेशन



ते नायलॉन प्लांट बल्याणी पर्यंत अनेक भागात भिंत उंच असल्याने तसेच भिंत जुनी व जीर्ण असल्याने अपघात घडत आहेत. जीर्ण व जुन्या भिंतीची तातडीने दुरुस्ती करून भिंतीची उंची कमी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.आंबिवली स्टेशन वरून बल्याणी कडे जात एमएच ०५ डीझेड ९१८२ क्रमांकाची रिक्षा चालवत होते. त्यावेळी अचानक भिंतीचा भाग रिक्षावर कोसळल्याने चालकाला दुखापत झाली आणि रिक्षाचे मोठे नुकसान झाले. घटनेनंतर परिसरात काही काळ घबराटीचे वातावरण निर्माण झाले.घटनास्थळी उपस्थित स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेत जखमी चालकाला सुरक्षित बाहेर काढले आणि उपचारासाठी रुग्णालयात हलविले.

# आमदार संजय केळकर यांच्या पुढाकाराने ‘देवाभाऊ चष्मा’ उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**ठाणे (सम्यक कासारे) :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार संजय केळकर यांच्या पुढाकाराने तसेच ‘देवाभाऊ चष्मा’ उपक्रमाचे निर्माते समाजसेवक शाकिब गोरे यांच्या सहकार्याने ठाणे शहरात सलग तीन दिवस भव्य नेत्रतपासणी व मोफत चष्मा वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.शिबिरात अत्याधुनिक उपकरणांच्या सहाय्याने नागरिकांची नेत्रतपासणी



करण्यात आली. नगरसेवक विकास पाटील, उषा वाघ, अमित सरैया, सुरेश कांबळे, नम्रता कोळी, अनिता यादव आणि कमत चौधरी यांच्या प्रभागांमध्ये हे शिबिर यशस्वीपणे पार पडले.या उपक्रमांतर्गत ५ हजारांहून अधिक नागरिकांची नेत्रतपासणी करण्यात आली असून, पात्र लाभार्थ्यांना मोफत ‘देवाभाऊ चष्मा’चे वितरण करण्यात आले.यावेळी आमदार संजय केळकर म्हणाले, "महाराष्ट्रात ‘देवाभाऊ’ हे नाव जनकल्याणाचा विश्वासार्ह ब्रँड बनले आहे. त्याच धर्तीवर ठाण्यात ‘देवाभाऊ चष्मा’ उपक्रमालाही नागरिकांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असून, भविष्यातही अशा लोकोपयोगी उपक्रमांवर भर दिला जाईल."या शिबिराला आमदार ॲड. निरंजन डावखरे, संदीप लेले यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून उपक्रमाचे कौतुक केले व आयोजकांना शुभेच्छा दिल्या.

# जेकेसी मानवाधिकार संरक्षण आणि भ्रष्टाचार निर्मूलन समितीचा पदग्रहण सोहळा उत्साहात

**उल्हासनगर (विशाल कारंडे) :** समाजातील अन्यायाविरोधात आवाज उठविण्यासोबतच मानवाधिकारांचे संरक्षण आणि भ्रष्टाचार निर्मूलनासाठी संघटितपणे कार्य करण्याचा दृढ संकल्प करत जे.के.सी. मानवाधिकार संरक्षण आणि भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा उल्हासनगर येथील टाऊन हॉलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी राष्ट्रीय, राज्य, जिल्हा व शहर स्तरावरील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे आणि




ओळखपत्रांचे वितरण करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात थोर महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली. संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक साठे यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध स्तरांवरील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी पदाची शपथ घेत समाजहित, मानवाधिकारांचे संरक्षण आणि भ्रष्टाचाराविरोधातील लढ्यात सक्रिय राहण्याची ग्वाही दिली.या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक शितल बामणे, माजी अग्निशमन प्रमुख बाळासाहेब नेटके, मोटिवेशनल अशोक चव्हाण,नाट्य अभिनेते बाळासाहेब तोरस्कर, संतोष रामचंद्र जाधव यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.यावेळी संस्थेच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत यमुताई अवकाळे यांची राष्ट्रीय उपाध्यक्ष, शिल्पा खांडेकर यांची राष्ट्रीय व्यवस्थापक, प्रणव जांबोलीकर यांची राष्ट्रीय सचिव, समाधान प्रधान यांची राष्ट्रीय कोषाध्यक्ष तर अविनाश औटी यांची राष्ट्रीय जनसंपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली.महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीत राजेश माने यांची प्रदेश अध्यक्ष, हरी चंदर आल्हाट यांची प्रदेश उपाध्यक्ष, अरुण ठोंबरे यांची सोशल मीडिया प्रमुख म्हणून निवड करण्यात आली.

# सर्वसामान्यांसाठी जीवनदायी ठरतंय ठाणे सिव्हिल रुग्णालय

■ तीन वर्षांत १७,३३० यशस्वी शस्त्रक्रिया
■ वेळेवर उपचार घेतल्यास जीव वाचू शकतो, सिव्हिलने पुन्हा सिद्ध केले

**ठाणे (रोहित जैसवार) :** गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी ठाणे जिल्हा सामान्य (सिव्हिल) रुग्णालय हे विश्वासाचे आरोग्यकेंद्र बनत आहे. नव्या सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल इमारतीचे काम सुरू असल्याने वागळे इस्टेट येथील तात्पुरत्या जागेतून सेवा देतानाही रुग्णालयाने उपचारांचा दर्जा कायम ठेवत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ६ जून २०२३ ते ३० जून २०२६ या कालावधीत रुग्णालयात १७,३३० शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्या. त्यामध्ये १०, ८२१ मोठ्या आणि ६,५०९ लहान शस्त्रक्रियांचा समावेश आहे.



> “रुग्णालय तात्पुरत्या ठिकाणी असले तरी दर्जेदार आणि अखंड रुग्णसेवा देणे हेच आमचे ध्येय आहे. प्रत्येक रुग्णाला सर्वोत्तम उपचार मिळावेत यासाठी संपूर्ण वैद्यकीय पथक सातत्याने कार्यरत आहे.
> — डॉ. कैलास पवार, (जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे)

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार आणि अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धीरज महांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालयात सर्वसामान्यांना खाजगी रुग्णालयांमध्ये लाखो रुपयांचा खर्च येणाऱ्या अनेक गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे केल्या जात आहेत.

अलीकडेच ४९ वर्षीय महिलेवर पाठीच्या मणक्याची तीन तासांची अत्यंत गुंतागुंतीची स्पाईन शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली.

खाजगी रुग्णालयात लाखो रुपयांचा खर्च अपेक्षित असताना सिव्हिल रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या प्रयत्नांमुळे रुग्णाला नवे आयुष्य मिळाले.

तसेच तंबाखूच्या सेवनामुळे जिभेच्या कर्करोगाने ग्रस्त असलेल्या ७० वर्षीय ज्येष्ठ नागरिकावर कमांडो शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली. ही अत्यंत क्लिष्ट शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमने यशस्वीरीत्या पूर्ण करून रुग्णाला दिलासा दिला.

याशिवाय, जन्मतः हाताची बोटे चिकटलेल्या सहा वर्षीय मुलीवर प्लास्टिक सर्जरीद्वारे पुनर्रचनात्मक शस्त्रक्रिया करून तिच्या आयुष्यात नवी आशा निर्माण करण्यात आली. आर्थिक परिस्थितीमुळे उपचार अशक्य वाटत असलेल्या अनेक रुग्णांसाठी सिव्हिल रुग्णालय खऱ्या अर्थाने आधारवड ठरत आहे.

रुग्णालयात लेप्रोटॉमी, हर्निया, सिझेरियन, अस्थिरोग, नेत्र, दंत, कान-नाक-घसा तसेच लेझर आणि दुर्बीणद्वारे विविध आधुनिक शस्त्रक्रिया नियमितपणे केल्या जात आहेत. तात्पुरत्या जागेतून सेवा सुरू असूनही उपचारांची गुणवत्ता, डॉक्टरांचे कौशल्य आणि रुग्णांविषयीची संवेदनशीलता यामुळे ठाणे सिव्हिल रुग्णालयाने सर्वसामान्यांचा विश्वास अधिक घट्ट झाला आहे.

# उल्हासनगर रेल्वे स्टेशन येथील पुर्व पश्चिम कडील धोकादायक स्कायवॉक हटविण्याचा महापालिका महासभेत ठराव मंजुर

**उल्हासनगर (विशाल पाटील) :** रेल्वे स्टेशन परिसरातील वाहतूक कोंडी, नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न आणि भविष्यातील विकासकामांना अडथळा ठरत असलेला उल्हासनगर पूर्व व पश्चिमेकडील दोन्ही स्कायवॉक निष्कासित करण्याचा निर्णय महापालिकेच्या वतीने घेण्यात आला असून तसा ठराव महासभेत मंजूर करण्यात आला आहे . त्यामुळे रेल्वे स्टेशन परिसराचा दोन्ही कडील विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे.सन २०१० मध्ये एमएमआरडीएने ३२ कोटी रुपये खर्चुन उल्हासनगर पूर्व पश्चिम रेल्वे स्टेशन परिसरात स्कायवॉक उभारण्यात आला होता. मात्र, कालांतराने या स्कायवॉकची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे येथील भंगार चोरानी स्कायवॉकची लोखंडी रेलिंग चोरुन नेल्या असुन , काही भाग गंजल्यामुळे जाड पत्रे खाली पडणे, तसेच अन्य भागांची झालेल्या दुरवस्था मुळे रेल्वे स्टेशन परिसरात रिक्षांच्या रांगेत उभे राहणारे रिक्षाचालक आणि प्रवाशांच्या जीविताला धोका निर्माण झाला होता. त्याचबरोबर नागरिकांपेक्षा असामाजिक तत्त्वांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढल्याने हा स्कायवॉक सुरक्षेच्या दृष्टीनेही गंभीर प्रश्न बनला होता.अनेक वेळा या स्कायवॉक चा काही भाग पडल्याने नागरिकां मध्ये भीती निर्माण झाली आहे .

या बाबत एक हाथ मदतीचा या सामाजिक संघटनेचे अध्यक्ष विजय कदम यांनी एम एम आर डी ए कडे लेखी तक्रार करून स्कायवॉक हटवण्याची मागणी केली होती. तर स्थानिक नगरसेवक चंद्रशेखर यादव यांनी महासभेत स्कायवॉक निष्कासित करण्याची मागणी केली होती. सभागृह नेते तथा शिवसेना गटनेते अरुण आशान,नगरसेवक राजेंद्र चौधरी , नगरसेवक , सोनू चानपूर, प्रदीप गोडसे, सूरज सोनकांबळे, माजी महापौर व नगरसेविका लिलाबाई आशान, शिक्षण समितीच्या सभापती साक्षी सुर्वे समवेत अन्य नगरसेवकांनी देखील स्कायवॉक हटवण्याची मागणी केली होती . त्यानंतर पूर्व आणि पश्चिमेकडील दोन्ही स्कायवॉक निष्कासित करण्यास महासभेने मंजुरी दिली आहे. हा स्कायवॉक हटविल्यानंतर रिक्षांच्या रांगा अधिक व्यवस्थित आणि सुटसुटीत होण्याची शक्यता आहे. तसेच रेल्वे स्टेशन परिसरात परिवहनची बस सेवा सुरू करण्या साठी मार्ग मोकळा झाला आहे .

तर गर्दुल्याचा वावर सुध्दा बंद होणार असुन पश्चिमे कडे महापालिकेच्या वतीने सॅटिस प्रकल्प सुरु होणार असल्याने या स्कायवॉकमुळे अडथळा निर्माण होत होता. त्यामुळे सदर स्कायवॉक निष्काशित करण्याशिवाय पर्याय नसल्याने आता स्टेशन जवळील दोन्ही परिसर मोकळा श्वास घेणार आहेत.

# तुकाराम मुंढेंचा दणका! बेकायदा औषधसाठ्यावर कारवाई

**कल्याण (प्रतिनिधी) :** कल्याण, डोंबिवली परिसरातील भेसळयुक्तखवा, मावा, पनीर आणि बेकायदा औषधसाठा करणाऱ्या आस्थापनांवर अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी विशेष लक्ष ठेवले आहे. दोन महिन्याच्या कालावधीत अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांनी कल्याण शहरातून लाखो रूपयांचा भेसळयुक्त साठा जप्त केला. या प्रकरणांची चौकशी सुरू असतानाच पथकाने कल्याण पूर्वेतील खडेगोळवलीतील प्रकाश पॉलिक्लिनिकवर छापा टाकून १ लाख ३ हजार ६९० रूपयांचा विनापरवाना औषधसाठा जप्त करण्याची कारवाई केली.

रुग्णालये, दवाखान्यात येणाऱ्या रूग्णांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या, बेकायदेशीर





औषध विक्री व्यवसाय आणि नियमबाह्य पध्दतीने औषधांचा साठा करणाऱ्या आस्थापनांना वचक बसावा म्हणून अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी कल्याण-डोंबिवली शहरांकडे तपासणीसाठी आपला मोर्चा वळविला आहे. काही दिवसांपूर्वी डोंबिवलीतील शिंदे शिवसेनेच्या माजी नगरसेविका मनीषा धात्रक यांनी आयुक्त मुंढे यांना निवेदन देऊन कल्याण डोंबिवली शहरात सुरू असलेल्या खाद्य पदार्थांच्या हातगाड्या, उपहारगृहातील अस्वच्छता, आईस्क्रिम, दुग्धजन्य पदार्थांची उघड्यावर विक्री, नियमबाह्य औषध साठा करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करण्याची मागणी केली होती. याप्रकरणी निश्चित कारवाईचे आश्वासन आयुक्त मुंढे यांनी धात्रक यांना दिले आहे. त्यानुसार ही कारवाई करण्यात आली.

कल्याण पूर्व भागातील खडेगोळवलीत मे. प्रकाश पॉलीक्लिनिक ॲन्ड हेल्थ हॉस्पिटॅलिटीमध्ये अन्न व औषध प्रशासन, आरोग्य विभागाच्या संयुक्त पथकाने अचानक प्रकाश पॉलिक्लिनिकवर छापा टाकला. या कारवाईत अधिकाऱ्यांनी लाखो रूपये किंमतीचा विनापरवाना औषधसाठा ताब्यात घेऊन त्याचे नमुने तपासणीसाठी शासनाच्या न्यायवैद्यक प्रयोगशाळेकडे पाठविले असल्याचे अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. या औषधांच्या खरेदी-विक्रीसाठी आवश्यक परवाना नसताना औषधोपचार करणे आणि औषधांचा साठा करणे हा औषध व सौंदर्यप्रसाधने कायदा १९४० चा भंग असल्याने जप्तीची कारवाई केली. यावेळी १ लाख ३ हजार ६९० रूपये किंमतीचा साठा हस्तगत केला. प्रयोगशाळेच्या अहवालानंतर कायदेशीर कारवाई पुढील कायदेशीर प्रक्रिया आणि तपासणीसाठी या साठ्यातील दोन वेगवेगळ्या औषधांचे नमुने घेऊन ते विश्लेषणासाठी शासकीय प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले आहेत. त्या अहवालाच्या आधारे पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. या घटनेमुळे खडेगोळवली परिसरामध्ये खळबळ उडाली आहे. परवाना नसताना औषधे विकणाऱ्या आणि रूग्णांच्या जीवाशी खेळणाऱ्या अशा आस्थापनांवर कठोर कारवाईचा धडाका यापुढेही सुरूच राहणार असल्याचे अन्न व औषध प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. तरसुदृढ आरोग्य हा प्रत्येकाचा अधिकार आहे. त्याच्याशी तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा अन्न आणि औषध प्रशासनाने दिला आहे.

# अलर्ट सिस्टमसह पूरनियंत्रण

## मुंबईत ३५० ठिकाणी उपाययोजना




**मुंबई (विशाल कारंडे) :** दरवर्षी मुसळधार पावसामुळे निर्माण होणाऱ्या पूरस्थितीवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी मुंबई महापालिकेने १३ हजार कोटींचा एकात्मिक पूरनियंत्रण आराखडा तयार केला आहे. या आराखड्यांतर्गत मुंबईत आणखी ३३ ठिकाणी फ्लड गेट आणि पंपिंग यंत्रणा उभारली जाणार असून, नद्या व प्रमुख नाल्यांमध्ये पाण्याची पातळी मोजणारी अत्याधुनिक सेन्सर प्रणाली बसवण्यात येणार आहे.

या प्रकल्पाच्या कामांना ऑक्टोबर २०२६ पासून सुरुवात होणार असून ऑक्टोबर २०२९ पर्यंत संपूर्ण आराखडा पूर्ण करण्याचे नियोजन असल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली. महत्त्वाकांक्षी पूरनियंत्रण प्रकल्पाला केंद्र सरकारकडून तत्त्वतः मंजुरी मिळाली असून, निधीसाठी प्रस्तावही केंद्राकडे पाठवण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच विधानसभेत दिली होती.

२६ जुलै २००५ रोजी मुंबईत एका दिवसात तब्बल ९४४ मिमी पावसाची नोंद झाली होती. या महापुरानंतर सत्यशोधन समितीच्या शिफारशीनुसार ब्रिमस्टोवॅड प्रकल्पांतर्गत पर्जन्य जलवाहिन्यांचे रुंदीकरण, खोलीकरण, आरसीसी वाहिन्या, भूमिगत नाल्यांचे पुनर्वसन आणि पम्पिंग स्टेशन उभारणीसह अनेक कामांवर हजारो कोटी रुपये खर्च करण्यात आले. मात्र, शहरातील पाणी साचणाऱ्या ठिकाणांची संख्या अपेक्षित प्रमाणात कमी झालेली नाही.

नव्या आराखड्याच्या पहिल्या टप्प्यात माहुल आणि मोगरा पम्पिंग स्टेशनची उभारणी, तसेच मिठी नदीतील तिसऱ्या टप्प्यातील १८ फ्लड गेट, सेवा रस्ते आणि संरक्षण भिंतींची कामे हाती घेतली जाणार आहेत. याशिवाय मुंबईतील आणखी ३३ ठिकाणी फ्लड गेट व पम्पिंग यंत्रणा उभारण्यात येणार आहे. नाल्यांमध्ये कचरा जाण्यापासून प्रतिबंध करण्यासाठी काही ठिकाणी आठ ते दहा फूट उंच संरक्षक जाळ्या बसवण्यात येतील. तसेच शहरातील ३५० पूरप्रवण ठिकाणांवर विशेष उपाययोजना केल्या जाणार आहेत.

**पर्जन्य जलवाहिन्यांची क्षमता वाढणार**

सध्या मुंबईतील पर्जन्य जलवाहिन्या ताशी सुमारे ५० मिमी पावसाचा निचरा करण्याच्या क्षमतेच्या आहेत. नव्या आराखड्याद्वारे ही क्षमता १०० ते १२० मिमी पावसापर्यंत वाढविण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. त्यामुळे अतिवृष्टीच्या काळात पाणी साचण्याचे प्रमाण कमी होण्याची अपेक्षा आहे.

**पूरस्थितीचा इशारा देणारी स्मार्ट सेन्सर प्रणाली**

मिठी, दहिसर आणि पोईसर नद्यांसह प्रमुख नाल्यांमध्ये पाण्याची पातळी मोजणारे सेन्सर बसवले जाणार आहेत. पाण्याची पातळी धोक्याच्या मर्यादेजवळ पोहोचताच, महापालिकेच्या नियंत्रण कक्षाला तत्काळ अलर्ट मिळेल किंवा सायरनद्वारे सूचना दिली जाईल. त्यामुळे आपत्कालीन यंत्रणांना वेळेत प्रतिसाद देणे शक्य होणार आहे. सध्या मुंबईत प्रायोगिक तत्त्वावर सात ठिकाणी ही यंत्रणा कार्यरत असून, नव्या प्रकल्पांतर्गत तिचा मोठ्या प्रमाणावर विस्तार केला जाणार आहे.

**अंधेरी सबवेसाठी विशेष उपाय**

दरवर्षी पावसाळ्यात पाण्याखाली जाणाऱ्या अंधेरी सबवेचाही या आराखड्यात समावेश करण्यात आला आहे. सबवेमध्ये पाणी साचू नये यासाठी तीन पाणी साठवण टाक्या उभारण्याचा प्रस्ताव आहे. तसेच पाण्याचा निचरा जलद होण्यासाठी पर्यायी पर्जन्य जलवाहिनी टाकण्याचाही महापालिका विचार करत आहे. त्यामुळे अंधेरी सबवे कायमस्वरूपी पूरमुक्त करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

# धाडसावर ट्रोलिंगची सावली; मॉडेलची सायबर सेलकडे धाव

**मुंबई (प्रतिनिधी) :** कॉक्रोच जनता पार्टीचं आंदोलन दिल्लीतल्या जंतर-मंतर या मैदानावर ३७ दिवस सुरु होतं. २५ जुलैला धर्मेंद्र प्रधान यांनी केंद्रीय मंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि हे आंदोलन मागे घेण्यात आलं. या आंदोलनाला देशभरातून चांगला प्रतिसाद मिळाला. मुंबईत २२ जुलैला विद्यार्थी जेव्हा जमले होते तेव्हा अनेक आंदोलक विद्यार्थ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं होतं. त्यांना घेऊन जाणाऱ्या व्हॅनपुढे एक मॉडेल उभी राहिली होती. तिचा फोटो व्हायरल झाला होता. आता त्याच मॉडेलने मुंबई पोलिसांच्या सायबर सेलकडे धाव घेतली आहे. कारण तिला ऑनलाइन धमक्या दिल्या जात आहेत, छळ केला जातो आहे.



**नेमकं रिया यादवचं म्हणणं काय?**

मुंबईतील दादरमध्ये विद्यार्थी आंदोलनाच्या दरम्यान थेट पोलिसांच्या व्हॅनसमोर उभी राहणारी २७ वर्षांची मॉडेल रिया यादव अहिर क्षणार्धात सोशल मीडियावर व्हायरल झाली. रियाचा फोटो अनेकांनी पोस्ट केला आणि तिला समर्थन दिलं. आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मुंबई पोलीस व्हॅनमधून नेत असताना रिया थेट गाडीसमोर उभी राहिली. तिने एकटीने ती व्हॅनला पुढे जाण्यापासून थांबवलं होतं. एकीकडे रियाच्या धाडसाचं कौतुक होतंय. पण दुसरी बाजू आता समोर आली आहे. रियाच्या पोस्टमध्ये तिने उल्लेख केल्यानुसार तिला धमक्या, ट्रोलिंग आणि छळाचाही सामना करावा लागत आहे. सातत्याने होणाऱ्या या ट्रोलिंगविरोधात अखेर तिने महाराष्ट्र सायबर सेलकडे तक्रार केली आहे. रियाने शनिवारी सायबर सेलकडे ऑनलाइन तक्रार दाखल केली असून याप्रकरणी एफआयआर नोंदवण्याची मागणी तिने केली आहे.


**दुसऱ्यांना नावं ठेवणं सोप असतं आणि भूमिका घेणं कठीण-रिया यादव**

कॉक्रोच जनता पार्टीच्या विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी देशातल्या प्रमुख शहरांमध्ये आंदोलन झालं. २२ जुलै २०२६ च्या दिवशी मुंबईतील दादर परिसरातही आंदोलनासाठी विद्यार्थी आणि तरुण जमले होते. यावेळी रिया अहिरने थेट पोलिसांची व्हॅन अडवून सर्वांचं लक्ष वेधलं होतं. पोलीस व्हॅनमधील आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांची तिने सुटका करून घेतली होती.

# कोस्टल रोडवर ‘पेड ग्रीन झोन’

## ७० हेक्टर हरितक्षेत्राचा रिलायन्सकडे विकास

**मुंबई (विशाल पाटील) :** वांद्रे-वरळी सीलिंक ते मरीन ड्राइव्ह दरम्यानच्या मुंबई सागरीकिनाऱ्यालगत ७० हेक्टरवर हरित क्षेत्र विकसित करण्यात येणार आहे. एकूण क्षेत्रफळापैकी १५ टक्के जागेवर विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मात्र १५ टक्के जागेवर विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने याठिकाणी तिकिटासाठी पैसे आकारण्यात येणार आहे, तर उर्वरित ८५ टक्के क्षेत्र नागरिकांसाठी विनामूल्य खुले असणार आहे. या हरितक्षेत्राचा



विकास रिलायन्स फाऊंडेशनच्या सीएसआर निधीतून करण्यात येत आहे.प्रिन्सेस स्ट्रीट उड्डाणपुलापासून वांद्रे-वरळी सीलिंकच्या वरळी टोकापर्यंत १०.५८ किलोमीटर लांबीच्या सागरीकिनारा मार्गाच्या दोन्ही बाजूंना हे हरितक्षेत्र विकसित केले जात आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ४०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित होता. मात्र महापालिकेच्या निधीवरील भार कमी करण्यासाठी हा प्रकल्प सीएसआर माध्यमातून राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आणि रिलायन्स फाऊंडेशनने त्याची जबाबदारी स्वीकारली. हरितक्षेत्राच्या आराखड्याबाबत जून २०२६ मध्ये सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली होती. त्यावेळी तिकीट आधारित मनोरंजनात्मक क्षेत्राचा विस्तार मर्यादित ठेवण्याबाबत न्यायालयाने सूचना केल्या होत्या. त्या स्वीकारत रिलायन्स फाऊंडेशनने किमान ८५ टक्के क्षेत्र नागरिकांसाठी विनामूल्य खुले ठेवण्याचे हमीपत्र दिले.

# समृद्धी महामार्गावर आज तासभर वाहतूक बंद

**मुंबई (राकेश गायकवाड) :** ‘हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागपूर – मुंबई समृद्धी महामार्गा’वर मंगळवारी दुपारी गॅन्ट्री बसविण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. बुलढाणा – जालनादरम्यान दुपारी १२ ते १ या वेळेत हे काम करण्यात येणार आहे. या कामादरम्यान मुंबई वाहिनीवर तासाभराचा वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे या वेळेत बुलढाणा – जालनादरम्यान महामार्गावरील मुंबई वाहिनीवरून होणारी वाहतूक पूर्णतः बंद राहील.

नागपूर – मुंबई दरम्यानच्या ७०१ किमी लांबीच्या समृद्धी



महामार्गामुळे मुंबई – नागपूर प्रवास अतिजलद झाला आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) येथील वाहतुकीचे व्यवस्थापन अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे करण्यासाठी समृद्धी महामार्गावर ‘इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम’ (आयटीएमएस) कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला आहे. अत्याधुनिक अशा या यंत्रणेमुळे मार्गावरील वाहतुकीचे नियमन करून वाहतुकीला शिस्त लावण्यात येणार आहे. तर अपघात रोखण्यासाठी अत्यावश्यक त्या सर्व उपयोजना करण्यात येणार आहेत.

यासाठी कोरियाचे तंत्रज्ञान वापरण्यात येणार आहे. या निर्णयानुसार ‘एमएसआरडीसी’ने सध्या ‘आयटीएमएस’ यंत्रणा बसविण्याचे काम हाती घेतले आहे. या कामाअंतर्गत महामार्गावर गॅन्ट्री बसविण्यात येत असून या कामासाठी आवश्यकतेनुसार वाहतूक ब्लॉक घेण्यात येत आहेत. त्यानुसार मंगळवारी बुलढाणा-जालनादरम्यान गॅन्ट्री बसविण्याचे काम केले जाणार आहे, अशी माहिती एमएसआरडीसीकडून एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आली.बुलढाणा जिल्ह्यातील लोणार, सिंदखेडराजा, देऊळगावराजा, तसेच जालना जिल्ह्यातील साखळी क्रमांक ३२२ ते ३५१-९०० दरम्यान मुंबई वाहिनीवर दुपारी १२ ते १ या वेळेत गॅन्ट्री बसविण्याचे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे या दरम्यानची मुंबई वाहिनीवरील वाहतूक तासाभरासाठी बंद ठेवण्यात येणार आहे. काम पूर्ण झाल्यानंतर वाहतूक पूर्ववत केली जाईल. त्यामुळे मंगळवारी समृद्धी महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालक – प्रवाशांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन एमएसआरडीसीकडून करण्यात आले आहे.

# वीर जवान फाउंडेशनतर्फे कारगिल विजय दिवसाचा भव्य सोहळा

## चौदा वीरांगनांचा प्रत्येकी पन्नास हजारांनी केला गौरव

**नवी मुंबई (भावना जैन) :** वीर जवान फाउंडेशनच्या वतीने वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात रविवारी कारगिल विजय दिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेला शौर्य, सन्मान आणि राष्ट्रभक्तीचा भव्य सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात संपन्न झाला.या कार्यक्रमाला पद्मश्री पार्श्वगायक शंकर महादेवन, अतिरिक्त आयुक्त समीर वानखेडे, एनएसजी ब्लॅक कॅट कमांडो कर्नल अभिषेक कुमार, मेजर इंद्रजीत सिंह, कर्नल रानडे, वीर




जवान फाउंडेशनचे संस्थापक विजय नाहटा, (माजी सनदी अधिकारी), अभिनेते केतन करांडे, शौर्यचक्र विजेते मधुसूदन सुर्वे, वीर जवान फाउंडेशनचे अध्यक्ष सुरेश काकडे (निवृत्त , भारतीय सेना)तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर, वीरांगना, वीरमाता, एनसीसी कॅडेट्स आणि देशप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमातील सर्वात प्रेरणादायी क्षण म्हणजे १४ वीरांगनांचा विशेष सन्मानकरण्यात आला.त्यांच्या पतींच्या सर्वोच्च बलिदानाला मानवंदना म्हणून प्रत्येक वीरांगनेला ५०,००० इतकी आर्थिक मदत प्रदान करण्यात आली. हा सन्मान केवळ आर्थिक सहाय्य नसून, संपूर्ण राष्ट्राच्या कृतज्ञतेचे आणि त्यांच्या त्यागाविषयीच्या सर्वोच्च आदराचे प्रतीक ठरला.यानंतर पद्मश्री शंकर महादेवन यांनी आपल्या सुरेल आणि राष्ट्रभक्तीने भारलेल्या गीतांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या सादरीकरणामुळे संपूर्ण सभागृह देशभक्तीच्या भावनेने भारावून गेले. अनेक वीरांगना, वीरमाता आणि उपस्थित नागरिकांच्या डोळ्यांत अश्रू तरंगले.

# भाजीच्या आड लपवले खैर; वन विभागाने उघड केला मोठा प्रकार

**वसई (सतीश सोनावणे) :** वसई-विरार परिसरात खैर तस्करांनी पुन्हा एकदा डोके वर काढले असून, भाजीपाल्याची वाहतूक करत असल्याचे भासवून खैराच्या लाकडांची तस्करी करण्याचा एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. भाताणे वनक्षेत्रातील वन कर्मचाऱ्यांनी सोमवारी पहाटे मेढे परिसरात ही कारवाई केली. सुमारे ७ ते ८ किलोमीटर पाठलाग करून अवैध खैर वृक्षांची वाहतूक करणारा टेम्पो जप्त करण्यात आला असून, अंधाराचा फायदा घेत चालक पसार झाला आहे.

वसई पूर्वेच्या मेढे परिसरातून खैर लाकडाची बेकायदेशीर वाहतूक होणार असल्याची पक्की



बातमी वन विभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे वन अधिकाऱ्यांनी परिसरात तातडीने विशेष नाकाबंदी तैनात केली. पहाटेच्या सुमारास एक संशयित ‘टाटा इन्ट्रा’ टेम्पो (क्रमांक MH ४७ AS २४६०) येताना दिसला. वन कर्मचाऱ्यांनी इशारा करूनही चालकाने टेम्पो न थांबवता त्याचा वेग वाढवून पळ काढण्याचा प्रयत्न केला. वन कर्मचाऱ्यांच्या पथकाने भरधाव वेगात पाठलाग करून टेम्पोला रोखले; मात्र चालक अंधाराचा फायदा घेऊन पळून गेला.

जप्त केलेल्या टेम्पोची झडती घेतली असता वर भाजीपाला आणि खाली बेकायदेशीररीत्या खैर लाकडाची वाहतूक सुरू असल्याचे निष्पन्न झाले. या कारवाईत १.२८४ घनमीटर (एकूण ७७ ओंडके) खैर जातीचे लाकूड, ज्याची अंदाजे किंमत १४,८९२ रुपये आहे, तसेच टेम्पो असा मुद्देमाल वन विभागाने ताब्यात घेतला आहे.

ही कारवाई डहाणूचे उपवनसंरक्षक निरंजन दिवाकर आणि मांडवीचे उपविभागीय वनअधिकारी अमित भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यात भाताणेचे वनपरिक्षेत्र अधिकारी मनिष महाले, वनपाल आर. एस. माळगावी, व्ही. जी. राख, एन. बी. खुळपे तसेच वनरक्षक एस. एस. पवार, एल. एल. हमरे, डी. एन. सावरा व वनमजूर चंदन खानिवडेकर यांच्या पथकाने मोलाची भूमिका बजावली.

# मुंबईत धोकादायक इमारतींवर कारवाई सुरू

**मुंबई (प्रतिनिधी) :** दक्षिण मुंबईतील अतिधोकादायक इमारतींच्या यादीत नसलेल्या दोन उपकरप्राप्त इमारतींचा भाग कोसळल्यानंतर अतिधोकादायक इमारतींचा प्रश्न पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. या दुर्घटनांच्या पार्श्वभूमीवर म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाला जाग आली असून दुरुस्ती मंडळाने अतिधोकादायक यादीतील इमारती रिकाम्या करण्यास ठोस पाऊले उचलण्यास सुरुवात केली. त्यानुसार आतापर्यंत अतिधोकादायक ८२ पैकी १३ इमारती रिकाम्या करण्यात



आल्या. या इमारतींमधील ५० रहिवाशांना संक्रमण शिबिरात स्थलांतरित करण्यात आले. रिकाम्या करण्यात आलेल्या १३ इमारतींचे पाडकाम सुरू असून उर्वरित अतिधोकादायक इमारतीही रिकाम्या करण्याची प्रक्रिया सुरू आहे.दक्षिण मुंबईतील जुन्या-जीर्ण इमारतींच्या देखभाल, दुरुस्तीची जबाबदारी दुरुस्ती मंडळावर आहे. धोकादायक इमारतींची आवश्यकतेनुसार मंडळाकडून दुरुस्ती केली जाते. तर दरवर्षी पावसाळ्याआधी इमारतींचे सर्वेक्षण करून दुरुस्तीच्या पलीकडे गेलेल्या इमारतींचा

## १३ इमारती रिकाम्या

समावेश अतिधोकादायक इमारतींच्या यादीत केला जातो. पावसाळ्यापूर्वी या इमारती रिकाम्या केल्या जातात. येथे राहणाऱ्या रहिवाशांना संक्रमण शिबिरात हलविले जाते. त्यानुसार प्रत्येक वर्षी दुरुस्ती मंडळाकडून यादी तयार करण्यात येते. च्या यंदाच्या अतिधोकादायक इमारतींच्या यादीत ८२ इमारतींचा समावेश आहे. या इमारतींतील २१०२ रहिवाशांना सुरक्षितस्थळी हलवून इमारती रिकाम्या करून घेण्याचे आव्हान मंडळासमोर आहे. मात्र पावसाळा सुरू झाला तरी मंडळाकडून एकही इमारत रिकामी करून घेण्यात आली नव्हती.काही दिवसांपूर्वी अतिधोकादायक इमारतींच्या यादीत नसलेल्या दोन इमारतींचा भाग कोसळला. या दुर्घटनांनंतर अतिधोकादायक इमारतींमधील रहिवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित झाला. दुरुस्ती मंडळाकडून कोणतीच कारवाई होत नसल्याने टीका होत होती. पण अखेर आता मंडळाला जाग आली असून मंडळाने इमारती रिकाम्या करून घेण्यास सुरुवात केली आहे.

# जिल्हास्तरीय बाल सुरक्षा व वाहतूक विषयक बैठक संपन्न

**नवी मुंबई (धनश्री सट्टा) :** पोलीस आयुक्त कार्यालय, नवी मुंबई येथील संवाद हॉलमध्ये जिल्हास्तरीय बाल सुरक्षा व वाहतूक विषयक बैठक उत्साहात संपन्न झाली. या बैठकीस मा. पोलीस आयुक्त श्री. मिलिंद भारंबे, मा. सह पोलीस आयुक्त श्री. दीपक साकोरे, मा. पोलीस उपायुक्त (वाहतूक) श्री. राहुल खाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (वाहतूक) श्री. गावडे, प्रादेशिक परिवहन अधिकारी (RTO) तसेच नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील सर्व वाहतूक




विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उपस्थित होते.

बैठकीस नवी मुंबई पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील विविध शाळांचे मुख्याध्यापक, शाळा प्रतिनिधी, शालेय बस मालक, स्कूल ट्रान्सपोर्ट ऑपरेटर्स तसेच संबंधित विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा : संविधान आणि लोकशाहीचा विजय!



प्रवीण बागड़े

लोकशाहीत सत्ता बदलते, सरकारे येतात-जातात, मंत्री बदलतात पण जनतेच्या प्रश्नांची ताकद कधीच संपत नाही. देशाच्या राजधानीतील जंतर-मंतरवर गेल्या काही आठवड्यांपासून घुमणारा विद्यार्थ्यांचा आवाज अखेर सत्तेच्या सर्वोच्च दालनापर्यंत पोहोचला आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने या संघर्षाला एक ऐतिहासिक वळण मिळाले. नीट-युजी आणि राष्ट्रीय परीक्षांमधील कथित अनियमितता, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ, उत्तरदायित्वाची मागणी आणि सरकारच्या भूमिकेविरोधातील आंदोलन यामुळे निर्माण झालेल्या दबावाच्या पार्श्वभूमीवर प्रधान यांनी २५ जुलै २०२६ रोजी राजीनामा दिला. हा राजीनामा केवळ एका मंत्र्याचा राजीनामा नाही. हा प्रश्न विचारणाऱ्या तरुणाईचा विजय आहे. हा अहिंसक संघर्षाचा विजय आहे. हा संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा विजय आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, सत्तेपेक्षा जनता मोठी असते, याची लोकशाहीला पुन्हा एकदा झालेली जाणीव आहे. या विजयाच्या केंद्रस्थानी आहेत अभिजीत दिपके, 'कॉक्रोच जनता पार्टी', सोनम वांगचुक आणि हजारो विद्यार्थी-युवक.

**एका प्रश्नातून सुरू झालेली ठिणगी**

परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांसाठी केवळ प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिका नव्हे. परीक्षा म्हणजे त्यांच्या आयुष्याची दिशा. डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या एका गरीब विद्यार्थ्याने वर्षानुवर्षे केलेला अभ्यास, आई-वडिलांनी केलेला त्याग, घरातील आर्थिक परिस्थितीशी लढत त्याने मिळवलेली संधी, या सगळ्याचे मोल एका परीक्षेच्या निकालात दडलेले असते. म्हणूनच परीक्षेतील कथित पेपरफुटी किंवा गैरप्रकार हा केवळ प्रशासकीय दोष नसतो. तो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांवर झालेला प्रहार असतो. याच वेदनेतून प्रश्न उभा राहिला. "जर व्यवस्था चुकली, तर जबाबदार कोण?" आणि या प्रश्नाला आवाज मिळाला जंतर-मंतरवर. अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखाली सीजेपीने या आंदोलनाला संघटित रूप दिले. सुरुवातीला अनेकांनी या आंदोलनाची खिल्ली उडवली. 'कॉक्रोच' या नावामागे दडलेला उपरोध अनेकांना समजला नाही. पण ज्याला व्यवस्था नगण्य समजते, त्याच नगण्य समजल्या गेलेल्या आवाजाने अखेर सत्तेच्या भिंती हादरवल्या. जंतर-मंतरवरील आंदोलनात विद्यार्थ्यांसोबत युवक, पालक आणि विविध घटक सहभागी झाले. ६ जूनच्या आंदोलनापासून सीजेपीने शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी अधिक तीव्र केली आणि पुढील दिवसांत हा संघर्ष वाढत गेला.

**लाठीने प्रश्न सुटत नाहीत !**

लोकशाहीत आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याऐवजी त्यांच्यावर दडपशाही केली गेली, तर सरकारची नैतिक उंची कमी होते. जंतर-मंतर असो किंवा दिल्लीच्या रस्त्यांवरील संघर्ष विद्यार्थ्यांनी आपला आवाज बुलंद केला. काही ठिकाणी पोलिस कारवाई, आंदोलनांवर निर्बंध आणि आंदोलकांना रोखण्याचे प्रयत्न झाले. आंदोलनकर्त्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जचा निषेध करणे आवश्यक आहे. कारण लाठी विद्यार्थ्यांच्या शरीरावर बसते पण तिचा आवाज संपूर्ण देशाच्या विवेकाला ऐकू येतो. ज्यांच्या हातात कालपर्यंत पुस्तके होती, त्यांच्या हातात आज आंदोलनाचे फलक आले असतील तर त्यामागची कारणे सरकारने तातडीने शोधली पाहिजेत. विद्यार्थ्यांच्या हातातील पुस्तक काढून घेऊन त्यांना शांत करता येत नाही. लाठीने शरीर जखमी करता येते पण प्रश्न मारता येत नाहीत. पोलिस बंदोबस्त वाढवता येतो, पण लोकशाहीची अस्वस्थता बंदिस्त करता येत नाही.

**सोनम वांगचुक यांचा उपोषणाचा नैतिक दबाव:**

या संघर्षाला आणखी नैतिक बळ मिळाले ते शिक्षण सुधारणा कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या उपोषणामुळे. २६ दिवसांच्या उपोषणानंतर वांगचुक यांनी उपोषण सोडले; मात्र त्यांच्या आंदोलनाने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना राष्ट्रीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणले. उपोषण म्हणजे केवळ अन्नत्याग नाही. उपोषण म्हणजे, "माझ्या शरीराची किंमत मोजावी लागली तरी मी हा प्रश्न सोडणार नाही," असा नैतिक निर्धार. वांगचुक यांच्या उपोषणाने सरकारला एक कठीण प्रश्न विचारला, तो म्हणजे "विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या प्रश्नावरही सरकार इतके बहिरे होणार का?" एका बाजूला विद्यार्थ्यांचे आंदोलन, दुसऱ्या बाजूला सीजेपीचा संघर्ष आणि तिसऱ्या बाजूला वांगचुक यांचा उपोषणाचा नैतिक दबाव. या त्रिकोणाने आंदोलनाला वेगळी धार दिली.

**अभिजीत दिपके : उपहासातून प्रतिकाराची भाषा**

अभिजीत दिपके यांचे नेतृत्व या आंदोलनातील एक वेगळे प्रकरण ठरले. 'कॉक्रोच जनता पार्टी' या नावातूनच त्यांनी सत्तेच्या अहंकाराला आव्हान दिले. ज्याला तुम्ही नगण्य समजता, तोच कधीकधी सर्वात कठीण प्रश्न विचारतो. सीजेपीच्या या आंदोलनाने तरुणाईच्या असंतोषाला व्यासपीठ दिले. आंदोलनकर्त्यांनी जंतर-मंतरवर ठिय्या दिला, रात्रीही आंदोलन सुरू ठेवले आणि मागणी मान्य होईपर्यंत संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. "राजीनामा द्या!" ही मागणी हळूहळू आंदोलनाची घोषणा बनली आणि आज अखेर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा आला!

**धर्मेंद्र प्रधान यांच्या पत्रात काय आहे?**

राजीनामा देताना धर्मेंद्र प्रधान यांनी युवकांना उद्देशून पत्र लिहिले. त्यांनी आपल्या चार दशकांहून अधिक काळाच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याचा उल्लेख केला. विद्यार्थ्यांच्या आकांक्षा, स्वप्ने आणि भवितव्याबद्दल आदर व्यक्त केला. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मार्गदर्शन, विश्वास आणि सहकार्याबद्दल आभार मानले. नीट-युजी संदर्भातील घटनांचा उल्लेख करत त्यांनी सरकारने परीक्षा रद्द करणे, पुन्हा परीक्षा घेणे आणि पुढील काळात संगणकाधारित परीक्षेचा विचार करणे यांसारखी पावले उचलल्याचे सांगितले. पत्रातील सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांनी लिहिले की, जंतर-मंतर आणि देशातील परिस्थितीचा गैरफायदा 'राष्ट्रविरोधी शक्तींना' घेता येऊ नये, विद्यार्थ्यांचे



भविष्य कायदेशीर गुंतागुंतीत अडकू नये आणि त्यांना आपल्या अभ्यास व करिअरवर लक्ष केंद्रित करता यावे, या विचाराने त्यांनी पंतप्रधानांकडे राजीनामा सादर केला. पण हे पत्र वाचताना एक प्रश्न मात्र मनात येतो, जर विद्यार्थ्यांचे भविष्य खरोखरच सर्वोच्च असेल, तर त्या भविष्याशी संबंधित प्रश्न निर्माण होईपर्यंत जबाबदारी निश्चित का झाली नाही? आणि जर अखेर राजीनामा द्यावाच लागला, तर विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला इतके दिवस संघर्ष का करावा लागला? हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे.

**मोदी-शाह आणि सरकारला जनतेचे प्रश्न ऐकावेच लागतील!**

आजचा राजकीय प्रश्न केवळ धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यापुरता मर्यादित नाही. तर या घटनेने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या उत्तरदायित्वावरही प्रश्नचिन्ह उभे केले आहे. सत्ता कितीही प्रबळ असो, लोकशाहीत ती जनतेला उत्तरदायी असते. सरकारला प्रश्न विचारणाऱ्यांना देशद्रोही, राष्ट्रविरोधी किंवा अडथळा म्हणून हिणवण्याऐवजी त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देणे आवश्यक आहे. प्रधान यांच्या पत्रात 'राष्ट्रविरोधी शक्तींना' परिस्थितीचा फायदा घेऊ न देण्याचा उल्लेख आहे, परंतु आंदोलनातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना राष्ट्रविरोधी ठरविणे हा लोकशाहीचा मार्ग होऊ शकत नाही. विद्यार्थी प्रश्न विचारतात म्हणजे ते देशविरोधी होत नाहीत. सरकारवर टीका करतात म्हणजे ते राष्ट्रद्रोही होत नाहीत.राजीनामा मागतात म्हणजे ते संविधानविरोधी होत नाहीत. उलट संविधानानेच प्रत्येक नागरिकाला शांततापूर्ण आंदोलनाचा आणि अभिव्यक्तीचा अधिकार दिला आहे. म्हणूनच मोदी सरकारने आणि शाह यांनी या आंदोलनातून धडा घेतला पाहिजे. जनतेचा आवाज ऐकण्यासाठी निवडणुकीची वाट पाहण्याची गरज नसते. लोकशाही दररोज चालते संसदेत चालते, रस्त्यावर चालते, विद्यापीठात चालते आणि कधी कधी जंतर-मंतरवरही चालते.

**संसदेत आता फक्त प्रधान नव्हे, तर इतर भ्रष्ट मंत्र्यांच्याही राजीनाम्याची मागणी झाली पाहिजे!**

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने एक नवा राजकीय प्रश्न निर्माण केला आहे. जर एका प्रकरणात नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा देता येतो, तर इतर गंभीर आरोप आणि भ्रष्टाचाराच्या प्रकरणांतही मंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारायची की नाही? हा प्रश्न आता संसदेत विरोधी पक्षांनी अधिक तीव्रतेने उपस्थित केला पाहिजे. देशातील विविध घोटाळे, भ्रष्टाचाराचे आरोप, प्रशासकीय अपयश, शेतकरी, बेरोजगारी, महागाई, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील प्रश्न या सर्व विषयांवर सरकारने संसदेत उत्तर दिले पाहिजे. राजीनामा हा शिक्षा नसतो, तर तो नैतिक जबाबदारीचा स्वीकार असतो. म्हणूनच ज्या मंत्र्यांवर गंभीर आणि सिद्ध आरोप आहेत, ज्यांच्या कार्यकाळात मोठे प्रशासकीय अपयश झाले आहे किंवा ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे ठोस आरोप आहेत, त्यांच्या प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून आवश्यक असल्यास राजीनाम्याची मागणी संसदेत झाली पाहिजे. पण ही मागणी पुराव्यावर, कायद्यावर आणि संविधानिक प्रक्रियेवर आधारित असली पाहिजे, राजकीय सूडबुद्धीने नव्हे.

**विरोधकांचा सहभाग : आंदोलनाला व्यापक राजकीय दिशा**

या आंदोलनात विविध राजकीय पक्ष आणि विरोधी नेत्यांनीही सहभाग किंवा समर्थन व्यक्त केले. राष्ट्रीय परीक्षांच्या पारदर्शकतेचा प्रश्न हा कोणत्याही एका पक्षाचा मुद्दा नसून लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे. विरोधकांनी संसदेत हा प्रश्न उपस्थित करणे, सरकारला जाब विचारणे आणि विद्यार्थ्यांच्या मागण्यांना राजकीय व्यासपीठ मिळवून देणे ही लोकशाहीतील त्यांची भूमिका आहे. आंदोलनाच्या काळात विरोधकांनी संसदेतही या मुद्द्यावर सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला. मात्र या आंदोलनाचे श्रेय केवळ राजकीय पक्षांना देता येणार नाही. कारण आंदोलनाचा पहिला आवाज विद्यार्थ्यांचा होता. सीजेपीने तो आवाज संघटित केला. अभिजीत दिपके यांनी त्याला नेतृत्व दिले. सोनम वांगचुक यांनी त्याला नैतिक बळ दिले आणि देशभरातील जनतेने त्याला प्रतिसाद दिला. राजकीय पक्ष आले, पण आंदोलनाची ज्योत विद्यार्थ्यांनी पेटवली होती.

धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा झाला, पण आता पुढे काय?नीट आणि राष्ट्रीय परीक्षांची व्यवस्था पारदर्शक होणार का?पेपरफुटी करणाऱ्यांना कठोर शिक्षा होणार का? विद्यार्थ्यांना भरपाई मिळणार का? आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील सर्व अन्यायकारक कारवाई मागे घेतली जाणार का? परीक्षा व्यवस्थेतील भ्रष्टाचाराची मुळे उखडली जाणार का? या प्रश्नांची उत्तरे आता सरकारला द्यावी लागतील. कारण धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा हा या संघर्षाचा शेवट नसून, उत्तरदायित्वाच्या नव्या पर्वाची सुरुवात आहे. आज जंतर-मंतरवर विजयाचा जल्लोष आहे. उद्या हेच विद्यार्थी पुन्हा आपल्या वर्गात जातील. त्यांच्या हातात पुन्हा पुस्तके असतील, डोळ्यांत स्वप्ने असतील आणि मनात डॉक्टर, अभियंता, संशोधक किंवा अधिकारी होण्याची आकांक्षा असेल. पण त्या स्वप्नांसोबत त्यांच्या मनात एक विश्वासही असला पाहिजे. आपली मेहनत सुरक्षित आहे, आपले भविष्य सुरक्षित आहे आणि परीक्षा व्यवस्था निष्पक्ष आहे.

**संविधान जिंकले, लोकशाही जिंकली!**

आजच्या दिवसाचा सर्वांत मोठा संदेश हा आहे की सत्तेची ताकद कितीही मोठी असली तरी संविधानाच्या चौकटीत प्रश्न विचारणारा नागरिक त्याहून मोठा असतो. जंतर-मंतरवरील विद्यार्थ्यांनी हे सिद्ध केले, अभिजीत दिपके यांनी हे दाखवून दिले आणि सीजेपीने हे अधोरेखित केले. सोनम वांगचुक यांच्या उपोषणाने याला नैतिक बळ दिले आणि अखेर धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याने या संघर्षाला एक निर्णायक अध्याय मिळाला. पण हा विजय कोणाच्याही पराभवाचा उत्सव नसावा. हा व्यवस्थेच्या आत्मपरीक्षणाचा दिवस असला पाहिजे. मोदी सरकारने आत्मपरीक्षण करावे. अमित शाह यांनीही या लोकशाही संदेशाकडे गांभीर्याने पाहावे. संसदेने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सखोल चर्चा करावी आणि देशातील प्रत्येक राजकीय पक्षाने सत्ता कोणाचीही असो, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी तडजोड होणार नाही, यासाठी एकत्र उभे राहावे. कारण आज धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा झाला आहे. उद्या दुसरा मंत्री येईल. सरकारे बदलतील. सत्ताधारी बदलतील पण विद्यार्थ्यांचे भविष्य बदलता कामा नये.

आज सीजेपीचा संघर्ष यशस्वी झाला असेल, उद्या पुन्हा एखादा विद्यार्थी अन्यायाविरुद्ध उभा राहू शकतो. आज जंतर-मंतरवर घोषणा घुमल्या, उद्या त्या घोषणांचे रूप कायदा, धोरण आणि पारदर्शक व्यवस्थेत बदलले पाहिजे. म्हणूनच आजचा दिवस केवळ एका मंत्र्याच्या राजीनाम्याचा दिवस नाही. हा दिवस आहे विद्यार्थ्यांच्या अश्रूंना न्याय मिळवून देण्याच्या संघर्षाचा, सत्तेला प्रश्न विचारण्याच्या संविधानिक अधिकाराचा, अहिंसक आंदोलनाच्या नैतिक शक्तीचा आणि लोकशाहीच्या जिवंतपणाचा. सरकार चुकले तर प्रश्न विचारण्याचा अधिकार आपल्याला आहे, हा विश्वास जिवंत राहिला पाहिजे. कारण लोकशाहीत प्रश्न विचारणारा नागरिक हा व्यवस्थेचा शत्रू नसतो तर तो व्यवस्थेला अधिक जबाबदार बनवणारा घटक असतो. सत्तेला प्रश्न विचारण्याच्या संविधानिक अधिकाराचा, अभिजीत दिपके आणि सीजीपीच्या संघर्षाचा, सोनम वांगचुक यांच्या नैतिक लढ्याचा आणि सर्वांत महत्त्वाचे, भारताच्या संविधानाचा आणि लोकशाहीचा विजय कारण लोकशाहीत जनता हीच अंतिम सत्ता असते आणि जेव्हा जनता विशेषतः तिची तरुण पिढी.

अभिजीत दिपके आणि सीजेपीने आंदोलनाला संघटित आवाज दिला. सोनम वांगचुक यांच्या उपोषणाने संघर्षाला नैतिक बळ दिले. विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उतरून आपल्या भविष्याचा प्रश्न देशासमोर ठेवला. विरोधकांनी संसदेत हा मुद्दा उपस्थित केला. आणि अखेर सत्तेला जनतेच्या प्रश्नाकडे पाहावे लागले. मात्र खरी कसोटी आता सुरू झाली आहे. कारण लोकशाहीत जनता हीच अंतिम सत्ता असते आणि जेव्हा देशाची तरुणाई आपल्या भविष्याच्या हक्कासाठी उभी राहते, तेव्हा सत्तेच्या सर्वांत मजबूत भिंतीवरही एक प्रश्न कोरला जातो. आमच्या भविष्याची जबाबदारी कोण घेणार? आज त्या प्रश्नाचे पहिले उत्तर मिळाले आहे. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा! पण आता देशाला दुसरे आणि अधिक महत्त्वाचे उत्तर हवे आहे. पुन्हा कोणत्याही विद्यार्थ्याला आपल्या हक्कासाठी जंतर-मंतरवर यावे लागू नये, पुन्हा कोणत्याही पालकाला आपल्या मुलाच्या भविष्याची चिंता घेऊन रस्त्यावर उतरावे लागू नये आणि पुन्हा कोणत्याही परीक्षेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ नये. अशी निष्पक्ष, पारदर्शक आणि उत्तरदायी शिक्षणव्यवस्था आपण उभी करणार का? या प्रश्नाचे उत्तरच या संघर्षाचा खरा विजय ठरवेल. इतिहास आता त्या उत्तराची वाट पाहत आहे. हा प्रश्न केवळ सरकारला नाही तर तो संपूर्ण व्यवस्थेला आहे.

**संयुक्त पत्रकार परिषदेनंतर सरकारची नमती भूमिका**

संयुक्त पत्रकार परिषदेनंतर अखेर केंद्र सरकारने सीजीपीच्या आंदोलनकर्त्यांनी मांडलेल्या सर्व प्रमुख मागण्या मान्य करण्याची भूमिका घेतली आणि गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या संघर्षाला निर्णायक यश मिळाले. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करणे, परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता व विश्वासार्हता निर्माण करणे, दोषींवर कठोर कारवाई करणे, प्रभावित विद्यार्थ्यांना न्याय देणे तसेच आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन सरकारकडून देण्यात आले. त्यामुळे जंतर-मंतरवरील विद्यार्थ्यांचा संघर्ष, अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखालील सीजीपीची चिकाटी आणि सोनम वांगचुक यांच्या नैतिक दबावाला अखेर यश आले. सत्तेच्या दडपशाहीसमोर न झुकता संविधानिक आणि लोकशाही मार्गाने लढा दिला, तर जनतेच्या आवाजापुढे सत्तेलाही झुकावे लागते, याचा हा जिवंत पुरावा आहे.

# तुमच्या घरात किती पाणी वाया जाते?



डॉ. मंगेश कश्यप

आपल्याला आपल्या घरात किंवा कार्यालयात आपण किती पाणी वापरतो, याचा विचारसुद्धा आपल्या मनाला कधी शिवत नाही. पाणीबाणी स्थिती निर्माण होते तेव्हा मग आपण जागे व्हायला लागतो. ते म्हणजे, तहान लागल्यावर विहीर खोदायला घेण्यासारखे. अशी वेळ भविष्यात यायला नको म्हणून आज आपण एक छोटासा प्रयोग करूया! उद्या सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत घरात किती पाणी वापरले, याची मनात नोंद ठेवा. दात घासणे, आंघोळ, स्वयंपाक, भांडी, कपडे, संडास सगळ्या गोष्टी मोजा. संध्याकाळी बसा आणि हिशेब करा. बहुतेकांना आश्चर्याचा धक्का बसेल, 'एवढे पाणी वापरतो मी?'

भारतीय मानक संस्था (BIS - Bureau of Indian Standards) आणि गृहनिर्माण व नगरविकास मंत्रालय यांच्या नियमावलीनुसार शहरातील एका माणसाला दिवसाला १३५ लिटर पाणी पुरेसे असते. ग्रामीण भागात हे प्रमाण ५५ लिटर आहे; पण वास्तवात आपण यापेक्षा खूप जास्त वापरतो आणि त्यातील जवळजवळ ३० टक्के म्हणजे सुमारे ४५ लिटर पाणी रोज वाया जाते.

**घरातील पाणी कुठे कुठे जाते?**

भारतीय मानक संस्थेच्या राष्ट्रीय संहितेनुसार (NBC - National Building Code) एका माणसाचे १३५ लिटर पुढीलप्रमाणे वापरले जातात -

पिणे व स्वयंपाक १० लिटर,आंघोळ २० लिटर,कपडे व भांडी ४० लिटर,संडासाची स्वच्छता (फ्लश) ४५ लिटरआणि इतर कामे २३ लिटर.

आता यातील प्रत्येक गोष्टीत किती पाणी वाया जाते ते पाहूया! हे वाचताना थोडे चमकाल!

**दात घासणे/दाढी करणे- रोजची सवय**

दात घासताना अथवा दाढी करताना नळ चालू ठेवण्याची सवय बहुतेकांना असते. तीन ते पाच मिनिटांच्या या सवयीत साधारण २५ लिटर पाणी वाया जाते. म्हणजे महिन्याला ७५० लिटर आणि वर्षाला तब्बल ९,१२५ लिटर. फक्त दात घासताना अथवा दाढी करताना नळ बंद ठेवला आणि आवश्यक तेव्हाच सुरू केला, तर हेच काम फक्त अर्धा लिटरमध्ये होते. फक्त या एका सवयीने वर्षाला एक मोठा टँकर वाचेल.

**आंघोळ - बादली की शॉवर?**

शॉवरने आंघोळ करताना दरमिनिटाला १० लिटर पाणी वाहते. साबण लावताना, शाम्पू चोळताना नळ चालू असेल, तर



१५ ते २० मिनिटांत १५० ते २०० लिटर पाणी वाया जाते. बादलीने आंघोळ केल्यास एका माणसाला फक्त २० ते २५ लिटर पुरते. म्हणजे शॉवर बंद करून बादली वापरली, तर रोज किमान १०० लिटर पाणी वाचते. हे प्रतिव्यक्ती प्रतिदिवस आहे.

**भांडी घासणे - नळ चालू ठेवण्याची घाणेरडी सवय**

आपल्याकडे भांडी घासताना नळ सतत चालू ठेवला असेल, तर दिवसाला २० ते ६० लिटर पाणी वाया जाते. हॉटेल आणि खानावळींमध्ये हे प्रमाण आणखी जास्त असते. बकेटमध्ये पाणी भरून भांडी घासणे हा सोपा उपाय आहे. यात जवळजवळ निम्मे पाणी वाचते.

**कपडे धुणे - यंत्र असले तरी चुका होतात**

कपडे धुण्याच्या यंत्रात (Washing Machine) क्षमतेच्या अर्धे कपडे घालून पूर्ण वॉशिंग मशिन चालवणे म्हणजे दुप्पट पाणी वापरणे. एका पूर्ण चक्रात साधारण ५० ते ८० लिटर पाणी लागते. हे संपूर्ण कुटुंबाचे मिळून असते. चार जणांच्या कुटुंबात हे प्रतिव्यक्ती साधारण ७ ते १० लिटर विभागले जाते. आठवड्यातून दोनदा किंवा गरज असेल तेव्हा नेहमी वॉशिंग मशिन पूर्ण क्षमतेने चालवणे हाच सर्वात सोपा उपाय.

**संडासाची स्वच्छता फ्लश - सर्वात जास्त पाणी खाणारी गोष्ट**

शौचालयात एकदा फ्लश केल्यावर सुमारे ६ ते १० लिटर पाणी जाते. समजा दिवसातून पाच वेळा फ्लश केले, तर ३० ते ५० लिटर पाणी लागते, हे एकट्या माणसाचे! जुन्या फ्लश टाकी यंत्रणेत हे प्रमाण आणखी जास्त असते. दोन बटणांची फ्लश यंत्रणा बसवली, तर लघुशंकेसाठी कमी पाणी आणि मोठ्या कामासाठी जास्त पाणी वापरता येते. यात ३० टक्के पाणी वाचते.

**नळाची गळती - छोटी समस्या; पण मोठे नुकसान**

एक थेंब थेंब गळणारा नळ क्षुल्लक वाटतो; पण एका हळूहळू गळणाऱ्या नळातून दिवसाला किमान १ लिटर पाणी वाया जाते. नळातून सतत पाण्याची धार गळत असेल, तर दिवसाला २० ते ३० लिटर पाणी वाया जाते. संशोधनानुसार भारतातील शहरांत वितरण व्यवस्थेतून ४० टक्के पाणी गळतीमुळे वाया जाते. घरातील गळती त्वरित दुरुस्त करणे हे सर्वात महत्त्वाचे पाऊल आहे.

**प्रतिव्यक्ती प्रतिदिवस - घरातील वॉटर बजेट**

आता एक कागद घ्या आणि एका माणसाचे दैनंदिन पाण्याचे बजेट लिहा-दात घासणे (नळ बंद ठेवून) - ०.५ लिटर,दाढी करणे - २ लिटर,आंघोळ (बादलीने) - २० लिटर,पिणे व स्वयंपाक - १० लिटर,भांडी (बेसिनमध्ये भरून) - १० लिटर,कपडे धुणे (प्रतिव्यक्ती वाटा) - ७ लिटर,संडास फ्लश - ३० लिटर,इतर - १० लिटर. एकूण - साधारण ९० लिटर.

म्हणजे बचतीच्या सवयी पाळल्या, तर एका माणसाला ८५ ते ९० लिटर पाणी पुरेसे असते. त्यात त्याचे आरामात भागते, जे भारतीय मानक संस्थेच्या १३५ लिटर पाण्याच्या मर्यादेपेक्षा कमी आहे. उरलेले ४५ ते ५० लिटर म्हणजे पाणी बचत, हेच खरे वॉटर बजेट!

भारतात आज १६ कोटींहून अधिक लोकांना स्वच्छ पाणी मिळत नाही. ६० कोटी लोक पाण्याच्या तीव्र टंचाईशी झुंजत आहेत. आपण शहरात अथवा निमशहरात राहतो. आपण नळ उघडतो तेव्हा पाणी येते आणि आपल्याला वाटते की, असे पाणी उपलब्ध होणे हा आपला हक्क आहे; पण वस्तुस्थिती तशी नाही. वॉटर बजेट म्हणजे फक्त शास्त्रज्ञांचे किंवा सरकारचे काम नाही. ते घरातील प्रत्येक माणसाचे काम आहे.

जे पाणी आपण आज वाचवतो, ते पाणी आपण उद्यासाठी साठवतो. आपल्या मुलांसाठी, नातवंडांसाठी! तसेही आपल्या बेजबाबदार जलवर्तवणूक सुधारायला उशीर झाला आहे; पण अजूनही वेळ गेलेली नाही.

# ओडिशाची २४ वर्षीय ज्योतिर्मयी नायक ठरली इंडियन आयडॉलची विजेती

नुकतेच 'लाफ्टर शेफ'चे तिसरे पर्व संपले. या शोच्या तिसऱ्या सीझनमध्ये अली गोनी व जन्नत जुबैर हे विजेते ठरले. 'लाफ्टर शेफ'बरोबरच आणखी एक शो संपला आहे. इंडियन आयडॉल, असे या शोचे नाव आहे. इंडियन आयडॉलच्या १६ व्या पर्वाचा अंतिम सोहळा नुकताच पार पडला. आता या शोचे विजेतेपद कोणी पटकावले आहे, त्याबद्दल जाणून घेऊ...

ओडिशाच्या २४ वर्षीय ज्योतिर्मयी नायकने इंडियन आयडॉलच्या १६ व्या सीझनचे विजेतेपद पटकावले आहे. तर, जबलपूरचा तनिष्क शुक्ला हा उपविजेता ठरला. लोकप्रिय गायिका श्रेया घोषाल, बादशाह, विशाल ददलानी हे या शोचे परीक्षक होते. यादों की प्लेलिस्ट, अशी या सीझनची थीम होती.

**ज्योतिर्मयी नायकला किती लाखांची बक्षीसाची रक्कम मिळाली?**

या सीझनची विजेती ठरलेल्या ज्योतिर्मयीला ट्रॉफीबरोबर २० लाख इतकी बक्षिसाची रक्कम मिळाली. ज्योतिर्मयीने तिच्या विजयाचे श्रेय कर्करोगाने ग्रस्त असलेल्या रुग्णांना दिले, जे तिच्या म्युझिक थेरपीमुळे बरे होत आहेत.

इंडियन आयडॉलची विजेती ठरल्यानंतर ज्योतिर्मयीने तिच्या भावना व्यक्त केल्या. या शोच्या १० महिन्यांच्या प्रवासाबद्दल ती म्हणाली, "हा प्रवास जवळपास वर्षभराचा होता. मी १४ सप्टेंबरला मुंबईत आले आणि तेव्हापासूनचा हा प्रवास खूपच खास ठरला. सर्वांत आनंदाची गोष्ट म्हणजे या मेहनतीचं फळ मला विजेतेपदाच्या रूपाने मिळालं."




पुढे ती म्हणाली, "मी कधीच प्राईज मनी जिंकण्याचा विचार केला नव्हता. उत्तमोत्तम गाणं सादर करण्यावर मी लक्ष केंद्रित केले. तसेच, परीक्षकांकडून चांगल्या प्रतिक्रिया मिळाव्यात यावर मी भर दिला होता. त्यामुळे ही रक्कम कशी वापरायची याचाही मी विचार केला नव्हता. आता मात्र त्याबद्दल नक्की विचार करेन. शोमध्ये मला काही अजरामर गाणी सादर करण्याची संधी मिळाली आणि त्या सादरीकरणांना प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला, ते माझ्यासाठी सर्वांत आनंदाचे क्षण होते.

ज्योतिर्मयीने शास्त्रीय संगीतात प्रशिक्षण घेतले आहे. ती म्युझिक थेरपिस्ट म्हणूनही काम करते. ती म्हणाली, "मी 'इंडियन आयडॉल'मध्ये सहभागी होणारी पहिली ओडिया मुलगी आहे. माझे आई-वडील कायम माझ्या पाठीशी ठामपणे उभे राहिले, हे माझे भाग्य आहे. त्यांनी कधीच मला प्रश्न विचारले नाहीत किंवा कोणतीही गोष्ट करण्यापासून थांबवले नाही. मला नेहमीच काय करायचं आहे, याची स्पष्ट कल्पना होती. माझ्या आई-वडिलांच्या पाठिंब्यामुळेच आज मी इथपर्यंत पोहोचू शकले."

ती असेही म्हणाली, "म्युझिक थेरपीमुळे मला अनेकांचे आशीर्वाद मिळाले. मी कर्करोगग्रस्त रुग्णांना म्युझिक थेरपी देत असे आणि त्यांच्या आशीर्वादामुळेच मी 'इंडियन आयडॉल'च्या मंचापर्यंत पोहोचू शकले. मी त्यांच्यासाठी गाणी गायचे तेव्हा त्यांना खूप आनंद व्हायचा. ते नेहमी म्हणायचे की, तुला इंडियन आयडॉलसारख्या मोठ्या मंचावर पाहायचं आहे. जेव्हा माझं हे स्वप्न पूर्ण झालं, तेव्हा त्यांनाही खूप आनंद झाला."

दरम्यान, आता आगामी काळात ज्योतिर्मयी कोणत्या गाण्यांच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीस येणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# 'बटाट्याची चाळ'नव्या संगीतिकेच्या रूपात!

## ८ ऑगस्टला मुंबईत यशवंत नाट्यमंदिरात शुभारंभाचा प्रयोग

पु. ल. देशपांडे लिखित 'बटाट्याची चाळ' या अजरामर साहित्यकृतीतील 'एक संगीतक' या संकल्पनेला नव्या रंगमंचीय रूपात प्रेक्षकांसमोर आणण्याचा प्रयत्न 'या इथे चाळ बटाट्याची' या दोन अंकी आणि २१ कलाकारांसह गद्य संवादविरहित भव्य मराठी संगीतिकेतून करण्यात आला आहे. या संगीतिकेच्या शुभारंभाचे प्रयोग लवकरच रंगणार असून, मराठी रंगभूमीवरील हा एक वैशिष्ट्यपूर्ण संगीतप्रयोग ठरणार आहे.

पु. ल. देशपांडे यांनी सामान्य मराठी माणसांच्या जगण्यातील विनोद, आपुलकी, संघर्ष, नात्यांमधील ऊब आणि चाळ संस्कृतीचे जिवंत चित्र शब्दबद्ध केले. त्याच साहित्याचा आत्मा जपत, आजच्या पिढीशी संवाद साधणाऱ्या नव्या संगीतभाषेत हे नाट्य रूपांतर साकारण्यात




आले आहे. संवाद, गीत, संगीत आणि बहुपात्री रंगमंचीय मांडणी यांच्या माध्यमातून चाळीतील जीवनाचा हृदयस्पर्शी आणि रंजक पट या संगीतिकेत उलगडणार आहे. या संगीतिकेचे शुभारंभाचे प्रयोग एक ऑगस्ट रोजी दु. १२.३० वाजता बालगंधर्व रंगमंदिर, पुणे आणि ८ ऑगस्ट रोजी सायं. ४ वाजता यशवंत नाट्यमंदिर, माटुंगा, मुंबई येथे होणार आहेत.

'या इथे चाळ बटाट्याची' याचे मूळ लेखन व संगीत पु. ल. देशपांडे यांचे आहे. कार्यक्रमाची निर्मिती कपीश जोशी यांची असून दिग्दर्शन देवेंद्र भोमे, योगेश सप्रे यांचे आहे. संगीत दिग्दर्शन देवेंद्र भोमे यांचे असून नाट्यरूपांतर योगेश सप्रे यांचे आहे. पंढरीनाथ कांबळे, अजित परब, मिलिंद जोशी, आशुतोष मुंगळे, अंजली मराठे, शमिका भिडे, स्वरांगी मराठे, केतन पवार, वज्रांग आफळे, मधुरा आफळे, तन्वी परांजपे, इशिता सावळे, साक्षी देशपांडे अशी दमदार कलाकारांची फळी या कार्यक्रमातून आपल्या भेटीस येणार आहे. वाद्यवृंद कलाकारांमध्ये मंदार बगाडे, ओमकार जोशी, सई जोशी, सिद्धी देशपांडे, तनिष्का जोशी, दीप वैद्य, स्वप्निल कुंभार, केदार जाधव यांची उत्तम साथ मिळणार आहे.

नेपथ्य संदेश बेंद्रे, प्रकाशयोजना सुजय भडकमकर, वेशभूषा गायत्री चक्रदेव, नृत्य रचना मधुरा आफळे, निर्मिती सूत्रधार नितीन नाईक, पराग पब्लिसिटी तर सूत्रधार मयूर वैद्य आहेत. पारंपरिक मराठी संगीत रंगभूमीचा वारसा आणि आधुनिक रंगभाषेचा संगम घडविण्याचा प्रयत्न या निर्मितीत करण्यात आला असून, पु. ल. देशपांडे यांचे साहित्य, संगीत, नाटक यांवर प्रेम करणाऱ्या रसिकांसह नव्या पिढीलाही ही संगीतिका एका वेगळ्या अनुभवाची मेजवानी ठरेल, असा विश्वास निर्मात्यांनी व्यक्त केला आहे.

# रिअल लाईफ मायलेकी सिनेमात एकत्र झळकणार; मानसी कुलकर्णी म्हणाली, "अत्यंत भावनिक क्षण..."

अभिनेत्री मानसी कुलकर्णी सध्या 'तारिणी' मालिकेमुळे चर्चेत आहे. ती यामध्ये तारिणीच्या बॉसची म्हणजेच जया जगदाळे ही भूमिका साकारतेय. आता या मालिकेसह मानसी लवकरच एका सिनेमात सुद्धा झळकणार आहे. महत्त्वाचं म्हणजे यामध्ये मानसीच्या बालपणीची भूमिका तिचीच लेक साकारणार आहे. मराठी चित्रपटसृष्टीत कलाकारांच्या पुढच्या पिढीबद्दल प्रेक्षकांना नेहमीच विशेष आकर्षण असतं. 'द्विधा' या मराठी चित्रपटात अभिनेत्री मानसी कुलकर्णी 'श्रावणी' ही प्रमुख भूमिका साकारणार आहे. पण, तुम्हाला माहितीये का 'श्रावणी' या मध्यवर्ती व्यक्तिरेखेच्या बालपणीच्या भूमिकेत मानसीचीच कन्या ओवी झळकणार आहे. 'द्विधा' चित्रपटाच्या निमित्ताने ही



मायलेकीची जोडी एकत्र रुपेरी पडद्यावर झळकणार आहे.

विशेष म्हणजे, ओवीचा मोठ्या पडद्यावरचा हा पहिलाच ऑनस्क्रीन प्रयत्न असूनही तिने आत्मविश्वास, आणि निरागसतेने ही भूमिका साकारत सर्वांची दाद मिळवली आहे. या चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन निलेश भास्कर नाईक यांनी केलं असून, याच्या निर्मात्या विदुला रमेश आजगावकर आहेत. येत्या २१ ऑगस्टला हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

याविषयी अभिनेत्री मानसी कुलकर्णीने सांगितलं, "श्रावणीच्या बालपणीच्या भूमिकेसाठी ओवीची निवड हा माझ्यासाठी अत्यंत भावनिक क्षण होता. आई म्हणून तिचा पहिला ऑनस्क्रीन प्रवास पाहताना अभिमान वाटत होता, सोबत तिच्या अभिनयातील सहजता आणि आत्मविश्वास पाहून समाधान मिळालं. तिने ही भूमिका मनापासून आणि अत्यंत प्रामाणिकपणे साकारली आहे."

पहिल्याच अभिनय अनुभवाबद्दल ओवी म्हणाली, "सुरुवातीला थोडी भीती वाटत होती, पण आई आणि संपूर्ण टीमने मला खूप प्रोत्साहन दिलं. त्यामुळे मी ही भूमिका आत्मविश्वासाने करू शकले. 'द्विधा'मधून प्रेक्षकांसमोर येण्याची संधी मिळाल्याचा मला खूप आनंद आहे."

'द्विधा' हा केवळ बाप-लेकीच्या नात्यावर आधारित चित्रपट नसून, प्रत्येक नात्यातील प्रेम, विश्वास आणि भावभावनांचा हळवा प्रवास संवेदनशीलतेने मांडणारा चित्रपट आहे. या दोघींसह सिनेमात..सतीश पुळेकर, रेणुका दफ्तरदार, आस्ताद काळे, तन्वी कुलकर्णी, पुष्कर सराड, मनोज कोल्हटकर, भूषण कडू, प्रफुल्ल सावंत, हेमांगी वेळणकर यांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. तसेच 'द्विधा'मध्ये लोकप्रिय अभिनेता निमिष कुलकर्णी सुद्धा झळकणार आहे.

# बेलवाडी मल्लम्मा कोण होत्या? भूमी पेडणेकर साकारणार ऋषभ शेट्टीच्या 'द प्राइड ऑफ भारत : छत्रपती शिवाजी महाराज'मध्ये राणीची भूमिका

'कांतारा' स्टार ऋषभ शेट्टी त्याच्या आगामी ऐतिहासिक नाट्यपट 'द प्राईड ऑफ भारत: छत्रपती शिवाजी महाराज'च्या निर्मितीत व्यग्र आहे. तो या चित्रपटात मुख्य भूमिका साकारणार आहे. या चित्रपटाची निर्मिती संदीप सिंग यांनी केली आहे. हा चित्रपट पुढील वर्षी जानेवारीमध्ये रुपेरी पडद्यावर प्रदर्शित होणार आहे. ऋषभ व्यतिरिक्त चित्रपटामध्ये अर्जुन रामपाल आणि विवेक ओबेरॉय हेही स्टार्स दिसणार आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन आणि निर्मिती संदीप सिंग यांनी केली असून, ही दोन भागांची एक महाकाव्य कथा असणार आहे. आता, या चित्रपटाशी संबंधित एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनेत्री भूमी पेडणेकर 'द प्राईड ऑफ भारत: छत्रपती शिवाजी महाराज' या चित्रपटाच्या कलाकारांमध्ये सामील झाली आहे. या चित्रपटात भूमी कर्नाटकची वीर राणी, राणी बेलवाडी मल्लम्मा यांची भूमिका करणार आहे. चला जाणून घेऊया राणी बेलवाडी मल्लम्मा कोण होत्या.

**राणी बेलवाडी मल्लम्मा कोण होत्या? :** भारतीय इतिहासात, देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेक महिलांनी विविध भूमिका बजावल्या. काहींनी शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवली, तर काहींनी स्वातंत्र्य लढ्यात ब्रिटिशांना आव्हान दिले. राणी लक्ष्मीबाई आणि झलकारी बाई यांसारख्या शूर महिलांनी सैन्यासाठी ढाल म्हणूनही काम केलं. या शूर स्त्रियांमध्ये, बेलावडी मल्लम्मा यांचे नाव सर्वात आधी येते, ज्यांनी देशातील पहिली महिला लष्करी तुकडी स्थापन केली. असे करणाऱ्या त्या पहिल्या राणी होत्या. बेलावडी मल्लम्मा एक महिला योद्ध्या होत्या. त्यांना युद्धकलेचे ज्ञान होते आणि त्या उच्चशिक्षिततही होत्या. त्या घोडेस्वारी, भालाफेक आणि धनुर्विद्येतही पारंगत होत्या. बेलावडी मल्लम्मा यांचे गुरू शंकर भट्ट होते.

**भारताच्या पहिल्या महिला लष्करी तुकडीची स्थापना :** बेलावडी मल्लम्मा, ज्या राणी मल्लम्मा म्हणून ओळखल्या जातात, त्या राजा मधुलिंग यांच्या कन्या होत्या. आपल्या भावांप्रमाणेच, मल्लम्मा यांनीही शिक्षण आणि युद्धकलेचं प्रशिक्षण घेतलं होतं. त्यांचा जन्म १६२४ मध्ये कर्नाटकातील सोढे येथे झाला. राणी मल्लम्मा यांचा स्वयंवर बेलावडीचे राजा ईश्वरप्रभू यांच्यासाठी आयोजित करण्यात आला होता. लग्नानंतर लगेचच, मल्लम्मा यांनी आपल्या पतीबरोबर प्रशासकीय कामे सांभाळण्यास सुरुवात केली. याच काळात, त्यांनी ५००० हून अधिक महिला योद्ध्यांचा समावेश असलेले एक महिला सैन्य तयार केले. या तुकडीला भारतीय इतिहासातील पहिली महिला



लष्करी तुकडी मानले जाते.

**मराठा सैनिकांविरुद्ध बंड :** बेलवाडी मल्लम्मा यांनी छत्रपती शिवाजींच्या विशाल सैन्याचा धैर्यानं सामना केला. त्या शेवटपर्यंत मराठ्यांविरुद्ध खंबीरपणे उभ्या राहिल्या. असे म्हटले जाते की, जेव्हा शिवाजी महाराज लहान-मोठी राज्ये जिंकून बेलवाडीत आले, तेव्हा त्यांच्या सैन्यानं यादवड गावात तळ ठोकला. राजा ईश्वरप्रभू स्वतः शिवाजींचे प्रशंसक होते. राजा मराठा शासक आणि त्यांच्या सैन्याचे आपल्या राज्यात स्वागत करण्याच्या तयारीत होते, मात्र शिवाजींच्या सैन्यानं यादवडच्या शेतकऱ्यांशी गैरवर्तन केले, ज्यामुळं शिवाजी आणि ईश्वरप्रभू यांच्यात संघर्ष झाला. या लढाईत राणीनं आपल्या महिला सैन्याचं नेतृत्व केलं आणि १० मराठा सैनिकांना ठार मारले आणि २०० हून अधिक जणांना जखमी केले.

**शिवाजी महाराजांचा आदेश :** जेव्हा या लढाईची बातमी छत्रपती शिवाजी महाराजांपर्यंत पोहोचली, तेव्हा त्यांनी आपल्या सैनिकांना त्यांच्या गैरवर्तनाबद्दल फटकारलं. मात्र, स्त्रियांनी शिवाजीच्या सैन्याचा पराभव केल्याचे कळल्यावर, त्यानं बेलावडीविरुद्ध युद्धाचा आदेश दिला. हे युद्ध अनेक दिवस चालले आणि त्यात राजा ईश्वरप्रभू शहीद झाले.



# मेंदूच्या कॅन्सरची 'ही' ५ लक्षणे अजिबात दुर्लक्ष करू नका; साधी वाटणारी डोकेदुखी ठरू शकते जीवघेणी

तुम्हाला वारंवार डोकेदुखीचा त्रास होतो का किंवा कोणतेही स्पष्ट कारण नसताना थकवा जाणवतो का? किंवा तुम्हाला कधी कधी लक्ष केंद्रित करण्यात अडचण येते का किंवा तुमची दृष्टी अंधुक होते का? लोक अनेकदा अशा समस्यांकडे दुर्लक्ष करतात आणि त्यांना तणाव, कामाचा ताण किंवा झोपेच्या कमतरतेमुळे असे होत असल्याचे गृहीत धरतात. त्यामुळेच अनेकदा शरीराची सुरुवातीची लक्षणे वेळेवर ओळखली जात नाहीत आणि ती हळूहळू वाढत जातात. जरी यामागे नेहमीच मेंदूच्या कर्करोगासारखे गंभीर कारण असेलच, असे नाही; परंतु दुर्लक्ष केल्यास, अशी स्थिती लवकरच गंभीर रूप धारण करते. या लेखात, आम्ही तुम्हाला मेंदूच्या कर्करोगाच्या अशा लक्षणांबद्दल सांगणार आहोत, ज्यांना लोक अनेकदा किरकोळ समजतात.

**मेंदूचा कर्करोग म्हणजे काय आणि त्याची लक्षणे कशी दिसतात?**

मेंदूचा कर्करोग ही एक अशी स्थिती आहे, ज्यामध्ये मेंदूच्या पेशी असामान्यपणे वाढतात आणि गाठी तयार होतात. त्याचा मेंदूच्या सामान्य कार्यावर परिणाम होऊ शकतो आणि गंभीर आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात. मेंदूच्या कर्करोगाची सुरुवातीची लक्षणे हळूहळू दिसू शकतात. त्यामध्ये सतत डोकेदुखी, विशेषतः सकाळी, वारंवार उलट्या होणे, अंधुक किंवा दुहेरी दृष्टी, शरीराच्या एखाद्या भागात अशक्तपणा किंवा बधिरता आणि चालण्यात अडचण यांचा समावेश असू शकतो. याव्यतिरिक्त, काही लोकांमध्ये



स्मरणशक्ती कमी होणे, बोलण्यात अडचण येणे किंवा पूर्वी कधीही न आलेले झटके येणे हीदेखील सुरुवातीची लक्षणे असू शकतात. ही लक्षणे प्रत्येक व्यक्तीनुसार वेगवेगळी असू शकतात, त्यामुळे शरीरातील कोणत्याही असामान्य बदलांकडे लक्ष देणे आणि कोणतीही लक्षणे दिसल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.

**मेंदूच्या कर्करोगाची लक्षणे तणावाच्या लक्षणांपेक्षा कशी वेगळी?**

मेंदूच्या कर्करोगाची अनेक सुरुवातीची लक्षणे तणाव, मायग्रेन किंवा झोपेच्या कमतरतेमुळे होणाऱ्या लक्षणांसारखी असू शकतात. त्यामुळेच लोक अनेकदा त्यांना सामान्य समजून दुर्लक्ष करतात आणि उपचारात विलंब करतात. मात्र, जर डोकेदुखी कायम राहिली, वेदनाशामक औषधांनी आराम मिळत नसेल आणि त्यासोबत उलट्या, अंधुक दृष्टी आणि अशक्तपणा यांसारखी लक्षणे दिसत असतील, तर ताबडतोब न्यूरोलॉजिस्टचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे. तुम्ही या समस्येची तपासणी करून योग्य औषधोपचार करून घेतला पाहिजे, कारण- जर मेंदूच्या कर्करोगाचा धोका आढळला किंवा दुर्लक्षामुळे कर्करोग झाला, तर तुम्हाला भविष्यात गंभीर गुंतागुंतीला सामोरे जावे लागू शकते.

प्रत्येक डोकेदुखी हे मेंदूच्या कर्करोगाचे लक्षण आहे, असे आम्ही म्हणत नाही. हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की, डोकेदुखी, थकवा किंवा तणाव यांसारख्या समस्या अनेकदा सामान्य कारणांमुळे उद्भवतात आणि त्यांचा नेहमीच मेंदूच्या कर्करोगाशी संबंध नसतो. या आजाराबद्दल अचूक माहिती आणि जागरूकता अत्यंत महत्त्वाची आहे. जर कोणतीही लक्षणे कायम राहिली, पुन्हा उद्भवली किंवा कालांतराने अधिक गंभीर झाली, तर विनाविलंब डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि वेळेवर, योग्य तपासणी व उपचार करून घ्या.




**मेष** – प्रगतीचा नवा टप्पा गाठता येईल. समोरील व्यक्तीवर चटकन विश्वास ठेवू नका.
**वृषभ** – तडजोड केल्यास समस्या गंभीर स्वरूप धारण करणार नाही.
**मिथुन** – धार्मिक कार्यात सहभागाची संधी मिळेल. कामावर अधिक निष्ठा ठेवावी. कष्टाला मागे पडू नका.
**कर्क** – कर्तृत्वाला वाव मिळेल. मुलांकडून चांगली बातमी समजेल. घरातील व्यक्तीला कमी लेखू नका.
**सिंह** – स्पर्धा जिंकल्याने तुमचे महत्त्व वाढेल. नवीन वस्तूंची खरेदी कराल. आपल्या कामात क्षुल्लक अडचण येईल.
**कन्या** – पदाची मागणी करण्यापेक्षा कार्यावर भर द्या. यश मिळेल. महत्त्वाच्या विषयावर चर्चा करता येईल.
**तूळ** – खाण्याची चंगळ होईल. वेगळाच अनुभव घ्याल. जास्त भावनावश होऊ नका. मौल्यवान खरेदी कराल.
**वृश्चिक** – जीवनाला कलाटणी मिळेल. नवे कार्य आरंभ कराल. गरज नसेल तर फार बोलू नका.
**धनु** – क्षुल्लक कारणाने वाद होईल. आपली आध्यात्मिक आवड वाढीस लागेल.
**मकर** – नोकरीत महत्त्वाचा निर्णय घेता येईल.
**कुंभ** – प्रगतीच्या दृष्टीने पाऊल पडेल. व्यावसायिक स्थैर्याकडे लक्ष द्यावे. जोडीदाराशी मतभेद टाळा.
**मीन** – जुन्या गोष्टी फायदेशीर ठरू शकतात.

# Mirabai Chanu Secures India's 1st Gold At Glasgow; Rishikanta Takes Silver, Swimmers Reach Relay Final

**New Delhi :** Olympic medallist Mirabai Chanu underlined her status as India's greatest weightlifter of her generation with a record-shattering third successive Commonwealth Games gold, while Rishikanta Singh battled injury to claim a historic silver as the country enjoyed a productive day at the Games in Glasgow on Sunday.

Mirabai was in a league of her own in the women's 48kg competition, rewriting the Commonwealth and Commonwealth Games record books en route to lifting 190kg (85kg snatch and 105kg clean and jerk).

It was India's first gold in this edition of the Games and the third medal overall so far. Para powerlifter Jhandu Kumar had opened India's medal account with a bronze in the men's heavyweight event on Friday.

The 31-year-old Manipuri overcame a missed opening attempt in both the snatch and clean and jerk before recovering in trademark fashion to finish a massive 22kg ahead of Nigeria's Ruth Asuquo Nyong, who settled for silver with 168kg.

Having already secured the title and with the Asian Games less than two months away, Mirabai opted to skip her final clean and jerk attempt after breaking the Commonwealth Games records in clean and jerk and total lift. Before Mirabai's gold-winning show, Rishikanta Singh settled for a silver in the men's 60kg category after an injury denied him a realistic shot at gold.

The Manipuri lifter matched the Commonwealth Games record in the snatch with a 121kg effort and entered the clean and jerk in the lead. However, he could manage only 143kg after failing his final two attempts, finishing with a total of 264kg. Malaysia's Mohamad Aniq Kasdan seized the opportunity by producing a Games record 152kg clean and jerk for a winning total of 273kg, while Kenya's Joshua Amunga Mboya claimed bronze with 260kg.

Chanu expressed her delight after winning her third Commonwealth Games gold medal in the women's 48kg weightlifting event at Glasgow 2026, saying she was "extremely happy" to add another gold to India's tally.

Speaking to reporters after her victory, Chanu said that she was trying to bring the third gold medal for India and admitted that there was some pressure on her to perform well.

"I am very happy that I could bring the third Gold medal for India. There were a lot of things running in my mind. There was a little bit of pressure. I wanted to perform very well for the Indian weightlifting team. I am extremely happy for my third gold medal and the fourth medal in the Commonwealth Games," Chanu said.

**Came Here For Gold: Rishikanta**

Rishikanta revealed that a knee injury suffered a week before the competition resurfaced during the clean and jerk phase, robbing him of the power needed to complete his heavier lifts. "I came here for gold. After the snatch, I was in the leading position, but my knee created a problem. I was able to clean the weight but could not push because one thigh was not working properly. I tried my best," he told PTI.

The 28-year-old nevertheless scripted history by becoming the first male weightlifter from Manipur to win a Commonwealth Games medal and the first from the state to compete in the sport at the Games.

**PM Modi Congratulates Winners**

Prime Minister Narendra Modi hailed Mirabai Chanu and Rishikanta for their achievements. In a post on X, PM Modi congratulated Mirabai Chanu on winning the gold medal, praising her consistency and calling her an inspiration after adding another Commonwealth Games medal to her illustrious career."Another glorious chapter in Indian Weightlifting! The talented Mirabai Chanu once again showcased her skills at the Commonwealth Games with a stunning performance in the 48 kg category and winning Gold.



## Jadumani Singh Beats Pakistan's Rehman, Advances To Quarterfinals

**Glasgow :** Indian boxer Jadumani Singh Mandengbam advanced to the men's 55kg quarterfinals at the Commonwealth Games 2026 after defeating Pakistan's Sumama Rehman by a dominant 5-0 unanimous decision in the Round of 16 here on Sunday night, according to ESPN.



Jadumani delivered a solid performance against Rehman to secure a convincing victory and keep India's medal hopes alive in the category. The India-Pakistan clash carried the intensity expected from the sporting rivalry, with Jadumani continuing his impressive run at the Games. The Manipur pugilist had earlier defeated Scotland's Aaron Cullen in the Round of 32.

Rehman, who had received a bye in the opening round, entered the contest fresh but was unable to stop Jadumani from securing a comprehensive victory. Jadumani will return to the ring on Tuesday for his quarterfinal bout.

Meanwhile, India enjoyed a strong day at the Commonwealth Games 2026, with Mirabai Chanu winning gold in women's 48kg weightlifting with a combined lift of 190kg. Rishikanta Singh added a silver in the men's 60kg category.

In boxing, Preeti Pawar stormed into the women's 54kg quarterfinals with a second-round RSC win.

India's women's 3x3 wheelchair basketball team suffered its second straight defeat, losing to Scotland. At the same time, Pinki Singh and Rupa Rani Tirkey were eliminated from the women's pairs bowls event after a tie-break loss to England.

## India's 4x200m Freestyle Relay Team Finishes Sixth; Australia Win Gold

**Glasgow :** The Indian men's 4x200m freestyle relay team could not translate an encouraging qualification into a podium finish, ending sixth in the final at the Commonwealth Games swimming competition here on Sunday.



The quartet of Dhakshan Shashikumar, Aneesh Sunil Kumar Gowda, Aryan Nehra and Srihari Nataraj produced a much-improved performance, slashing nearly 10 seconds off their heat timing to clock 7:29.84.

However, they were unable to match the pace of the leading teams in a high-quality final. Australia underlined their supremacy by storming to the gold medal in a Commonwealth Games record time of 7:01.47.

England claimed silver in 7:04.98, while Wales took bronze with 7:09.59. India finished behind fifth-placed Malaysia (7:23.72).

The result highlighted the sizeable gap separating India from the sport's traditional powerhouses despite the relay team's encouraging progress.

Earlier in the day, the Indian quartet had qualified for the final after finishing third in Heat 2 with a time of 7:39.48, behind Australia (7:08.66) and England (7:18.13).

With Canada not starting, all four teams in the heat -- Australia, England, India and Jersey -- advanced to the eight-team final.

Australia led throughout the heat, while India were locked in an absorbing battle with Jersey for third.

Jersey held the advantage at the 350m mark before India briefly moved ahead, only to fall behind again at the 450m mark.

The Indians, however, finished strongly, reclaiming third place at the 700m mark and holding on through the closing stages to qualify comfortably.

Across the two heats, India advanced as the fifth-fastest team, with only Australia, Scotland, England and Wales posting quicker times before the final.

## Scientists Trace The Shocking Origin Of Human Eyes To An Ancient 'Cyclops': Study

**Washington DC :** Researchers say a tiny one-eyed ancestor that lived nearly 600 million years ago may have shaped the evolution of every vertebrate eye, including our own. They also found that its ancient median eye lives on today as the pineal gland, which helps synchronise our sleep with daylight. Humans and every other vertebrate may share an astonishingly strange ancestor: a tiny creature with a single eye centred on the top of its head.

Recent research from Lund University and the University of Sussex proposes that the earliest ancestor of vertebrates passed through a cyclops-like stage nearly 600 million years ago. According to the researchers, this animal's central eye eventually contributed to the development of the paired eyes used by vertebrates today. Even more remarkably, part of that ancient visual system may still survive inside the modern brain as the pineal gland, an organ that helps regulate sleep.

"The results are a surprise. They turn our understanding of the evolution of the eye and the brain upside down," says Dan-E Nilsson, professor emeritus in sensory biology at Lund University.

**A Tiny One-Eyed Ancestor**

The distant ancestor described by the researchers was a small creature resembling a worm. It lived in the ocean almost 600 million years ago and spent much of its life in one place, filtering plankton from the surrounding seawater for food.

Earlier in its evolutionary history, the organism appears to have possessed two eyes or at least two groups of cells capable of detecting light. Paired eyes are common throughout the animal kingdom because they help moving animals judge direction, distance, and the location of objects around them.

"We don't know whether the paired eyes in our branch of the evolutionary tree were just light-sensitive cells or simple image-forming eyes. We only know that the organism later lost them," says Dan-E Nilsson. Because the creature had adopted such a quiet and stationary way of life, it no longer depended heavily on paired vision. Over many generations, the eyes gradually disappeared because they offered little advantage.



The animal did, however, retain a cluster of cells that could sense light in the middle of its head. These cells developed into a primitive central eye, also known as a median eye. This simple organ probably did not create detailed pictures. Instead, it may have helped the animal distinguish night from day and determine which direction was upward, both of which would have been useful for surviving in the ocean.

**How Paired Eye Returned**

Millions of years later, the animal's descendants began swimming actively again. A mobile lifestyle created a renewed need for vision, especially the ability to detect food, obstacles, predators, and direction of movement. The researchers conclude that portions of the original median eye were repurposed through evolution, eventually giving rise to a new pair of image-forming eyes.

This unusual process may explain why vertebrate eyes are constructed so differently from the eyes of many other animals. "Now we finally understand why the eyes of vertebrates differ so radically from the eyes of all other animal groups, such as insects and squid. The film of our eyes -- the retina -- developed from the brain, whereas the eyes of insects and squid originate in the skin on the sides of the head," says Dan-E Nilsson.

The retina is the thin layer of tissue lining the back of the eye. It contains cells that detect light and convert it into electrical signals, which are then sent to the brain and assembled into the images we see. In vertebrates, the retina is closely linked to the brain because it developed from brain tissue during evolution. By comparison, the eyes of insects and squid arose through a different evolutionary route involving tissue on the surface of the head.

**A Strange Detour in Eye Evolution**

The researchers describe vertebrate eyes as the product of an unusual evolutionary detour. An ancestor first lost its paired eyes after becoming largely inactive, retained a simple central eye, and later used parts of that structure to build a new and more advanced visual system.

Their conclusion is based on a broad comparison of light-detecting cells across animal groups. The team examined where these cells appear in the body, how they function, and how they connect with other tissues and nerves.

This evidence suggests that vertebrate eyes arose through this specific sequence of changes rather than evolving from the same structures that produced the eyes of insects, squid, and other animals."For the first time, we now also understand the origin of the neural circuits that analyse the image in our retina," adds Dan-E Nilsson.

Neural circuits are networks of connected nerve cells that process information. In the retina, these circuits begin organising visual signals before they even reach the brain, helping identify features such as brightness, contrast, movement, and shape.

**The Ancient Eye Still Inside the Brain**

The most surprising part of the theory may be that the ancient median eye never disappeared completely. The researchers argue that its evolutionary remains survive today as the pineal gland, a small organ located deep within the vertebrate brain. Although humans do not use the pineal gland to see images, it remains connected to the body's response to light and darkness.

# नागपूरच्या सुनियोजित विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## सफाई कामगारांसह ५७९ उमेदवारांना नियुक्तीपत्रांचे वाटप

● नागपूर, नितीन देवळेकर :

जागतिक बँकेच्या अहवालानुसार येत्या दहा वर्षात नागपूर शहर जलदगतीने विकसित होत असून पायाभूत सुविधांच्या विकासामुळे शहराचा चेहरा बदलत आहे. एक वैश्विक शहर नवी ओळख निर्माण होत असल्यामुळे शहराच्या सुनियोजित विकासासाठी निधी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.महानगरपालिकेच्या हिरवळीवर आयोजित विशेष समारंभात शहरातील ४७६ सफाई कामगारांना कायम नियुक्तीपत्र तसेच सरळसेवा भरतीने १०३ युवकांना नियुक्तीपत्राचे वाटप मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी होते.

यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर नीता ठाकरे, आमदार सर्वश्री मोहन मते, कृष्णा खोपडे, उपमहापौर लिला हाथीबेड, राज्य सफाई कामगार आयोगाचे अध्यक्ष शेरसिंह डागोर, स्थायी समितीच्या अध्यक्षा शिवानी दाणी, महापालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर, अतिरिक्त आयुक्त मुरगनाथन एम., श्री. अंकित आदी अधिकारी तसेच विविध समित्यांचे सभापती, पदाधिकारी व नगरसेवक यावेळी उपस्थित होते.



शहर स्वच्छ व सुंदर राहिल्यास त्याचा सार्वजनिक आरोग्यावरही परिणाम होतो. स्वच्छतादूतांचा आस्थापना खर्च जास्त असल्यामुळे नियुक्तीसाठी विशेष सूट देण्यात आल्यामुळे मोठ्या प्रमाणात भरती झाल्याचे सांगताना मुख्यमंत्री म्हणाले की, लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार ४७६ स्वच्छतादूतांना नियुक्तीपत्र देण्यात आले आहेत. या समितीने सेवाविषयक बाबींचा अहवालानुसार शासन निर्णय निघूनही भरती होत नव्हती. या अहवालाच्या अंमलबजावणीला प्राधान्य दिल्यामुळे सफाई कामगारांचे विविध प्रश्न सोडविण्यात आल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

स्वच्छता कर्मचाऱ्यांना नागपूर महानगरपालिकेने नियुक्तीपत्रे देण्यासोबतच त्यांच्यासाठी मोफत घरकुल देण्याची योजना राज्यात सर्वात प्रथम राबविली आहे. ३०० चौरस फुटांच्या मोफत घरांसोबतच अधिकच्या बांधकामासाठी अतिरिक्त शुल्क भरल्यास मोठे घर देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे यावेळी सांगताना मुख्यमंत्री म्हणाले की, शहर स्वच्छ राहावे, आरोग्य चांगले राहावे, यासोबतच स्वच्छता दूतांच्या जीवनात परिवर्तन सुद्धा घडविण्यासाठी विशेष योजना राबविण्यात येत असल्याचे त्यांनी यावेळी जाहिर केले.नागपूर शहराचा वेगाने होत असलेला विकास व त्यासोबतच पायाभूत सुविधा, उंच इमारती यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता लक्षात घेऊन महानगरपालिकेने स्वच्छतेच्या दृष्टीने प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी सफाई कामगारांच्या पाल्यांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण सुरू करावे, अशी सूचना त्यांनी यावेळी केली. महानगरपालिकेच्या ऐतिहासिक हिरवळीवर राष्ट्रपतींसह अनेक मान्यवर व कलावंतांचे सत्कार समारंभ येथे आयोजित करण्यात आले आहेत. ही हिरवळ म्हणजे महानगरपालिकेच्या इतिहासाची साक्ष आहे. महापौर म्हणून व त्यापूर्वीही अनेक समारंभांना उपस्थित राहण्याचे भाग्य मला लाभले आहे. त्यामुळे महानगरपालिकेचा कार्यक्रम हिरवळीवरच आयोजित करावा, अशी सूचना केली होती. त्याअनुषंगाने या कार्यक्रमाचे आयोजन होत असल्याचे तसेच येथील कार्यक्रमांच्या स्मृतींना यावेळी मुख्यमंत्र्यांनी उजाळा दिला.

अध्यक्षीय भाषणात केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, शहराच्या विकासासोबतच स्वच्छता, खेळाचे मैदान व नागरिकांसाठी मुलभूत सुविधांचा विकास करताना येथील स्वच्छतेला प्राधान्य देण्याची आवश्यकता व्यक्त केली. नवनियुक्त कर्मचाऱ्यांना पारदर्शक व गतीमान प्रशासन देण्याची आवश्यकता व्यक्त करताना प्रत्येक प्रभागामध्ये खेळाची मैदाने २४ तास पाणीपुरवठा तसेच बेरोजगार युवकांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षणाला प्राधान्य द्यावे, अशी सूचना त्यांनी यावेळी केली.

प्रारंभी महापौर नीता ठाकरे यांनी स्वागत करून प्रास्ताविकामध्ये शहराच्या स्वच्छतेसाठी आवश्यक असलेल्या स्वच्छतादुतांच्या नियुक्त्यांसाठी विशेष सहकार्य केल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस व केंद्रीय मंत्री गडकरी यांचे आभार मानले.

## आपली बससाठी व्हॉट्स ॲप तिकीट प्रणालीचा शुभारंभ

आपली बस ही सेवा अधिक लोकाभिमुख व्हावी, यादृष्टीने व्हॉट्स ॲपद्वारे बसचे तिकीट देण्याचा शुभारंभ होत असल्यामुळे शहर अधिक स्मार्ट होणार असून स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी घरकुल योजना राबविण्यात येत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. उपमहापौर लिना हाथीबेड यांनी आभार मानले. मनिष सोनी यांनी सूत्रसंचालन केले.

# वर्षभरात साकार होणार आधुनिक ‘वैकुंठ धाम’

## मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते भूमिपूजन

● संभाजीनगर , दिगंबर जाधव :

शहरातील ऐतिहासिक कैलासनगर स्मशानभूमीच्या सर्वांगीण पुनर्विकास प्रकल्पाचे भूमिपूजन इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते आज झाले. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि सीएसएन फर्स्ट यांच्या संयुक्त विद्यमाने हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत असून, पुढील एका वर्षात आधुनिक



आणि पर्यावरणपूरक ‘वैकुंठ धाम’ उभारण्याचे उद्दिष्ट आहे. यावेळी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, महापौर समीर राजूरकर, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांच्यासह लोकप्रतिनिधी, प्रशासनातील अधिकारी आणि सीएसएन फर्स्टचे पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्री सावे म्हणाले, “प्रशासन, सामाजिक संस्था आणि सीएसआरच्या सहकार्याने उभे राहणारे असे समाजोपयोगी प्रकल्प ही काळाची गरज आहे.

# श्री क्षेत्र कपिलधारा तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध – मंत्री छगन भुजबळ

● नाशिक, सचिन कदम :

श्रीक्षेत्र कपिलधारा-कावनई हे सिंहस्थ कुंभमेळ्याशी ऐतिहासिक व धार्मिकदृष्ट्या निगडित असलेले महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर या परिसराचा सर्वांगीण विकास, पर्यावरण संवर्धन आणि भाविकांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले.

कावनई, ता. इगतपुरी येथे आज मंत्री भुजबळ यांच्या हस्ते आगामी सिंहस्थ महाकुंभाच्या पार्श्वभूमीवर आयोजित गंगा-गोदावरी पूजन सोहळा मंत्रोच्चारात विधिवत पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार हिरामण खोसकर, शहापूरचे आमदार शांताराम मोरे, माजी मंत्री बबनराव घोलप, माजी आमदार शिवराम झोले, जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रतिभा संगमनेरे, राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या माहेरकडील शिवाजीराव जाधव, सरपंच गोपाळ पाटील, महंत भक्तीचरणदास महाराज, महंत फलाहारीबाबा महाराज, महंत कल्कीराम महाराज, श्री



कपिल महामुनी आश्रम ट्रस्टचे पदाधिकारी, विविध मान्यवर, भाविक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री भुजबळ म्हणाले की, परंपरेनुसार श्रीक्षेत्र कपिलधारा हे सिंहस्थाशी संबंधित प्राचीन तीर्थक्षेत्र असून त्याचा धार्मिक आणि ऐतिहासिक वारसा जपत नियोजनबद्ध विकास करणे आवश्यक आहे. मागील सिंहस्थानंतर या परिसरात रस्ते, सिमेंट काँक्रीट रस्ते, तलाव विकास, इनर व आउटर रिंग रोडसह विविध पायाभूत सुविधांची कामे करण्यात आली असून उर्वरित कामेही टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येतील. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अनुषंगाने नाशिक, त्र्यंबकेश्वर व जिल्ह्यातील पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे. या भागात ११६ कोटींची विकासकामे सुरू आहेत. आगामी कुंभमेळ्यात देश-विदेशातून लाखो भाविक येणार असल्याने रस्ते, वाहतूक, पार्किंग, पिण्याचे पाणी, स्वच्छता, निवास व्यवस्था व इतर मूलभूत सुविधा सक्षम करण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

गोदावरीसह सर्व जलस्रोत स्वच्छ, प्रदूषणमुक्त व निर्मळ ठेवणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे सांगून त्यांनी स्वच्छ भारत अभियानाची भावना कृतीत उतरविण्याचे आवाहन केले. तीर्थक्षेत्रांमध्ये कचरा टाकू नये, परिसर स्वच्छ ठेवावा तसेच वृक्षारोपणाद्वारे पर्यावरण संवर्धनाला चालना द्यावी, असेही ते म्हणाले.

# जलसंपदा विभागाकडून शेतकऱ्यांशी संबंधित सर्वच प्रक्रिया ऑनलाईन करणार – मंत्री राधाकृष्ण विखे पाटील

● कोल्हापूर, प्रथमेश चव्हाण :

जलसंपदा विभागाकडून ज्या ज्या ठिकाणी पाण्याच्या अनुषंगाने शेतकऱ्यांचा संबंध येतो अशा संबंधित सर्वच प्रक्रिया येत्या महिनाभरात ऑनलाईन करणार असल्याचे जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले .

शासकीय विश्रामगृहातील राजर्षी शाहू सभागृहात महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,



पुणे अंतर्गत मुख्य अभियंता (ज. सं.) कृष्णा खोरे जलसंपदा विभाग कोल्हापूर येथील विभागीय कार्यालयाच्या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष आमदार राजेश क्षीरसागर, महापौर रूपाराणी निकम, खासदार धनंजय महाडिक, आमदार सर्वश्री चंद्रदीप नरके, अशोक माने, अमल महाडिक, माजी आमदार संजय घाटगे, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुण्याचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत धुमाळ प्रामुख्याने उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील म्हणाले, कृष्णा व गोदावरी खोरे महामंडळाची सुमारे ५६ हजार एकर जमीन जलसंपदा विभागाने स्वतःच्या नावावर करून घेतली आहे. यासाठी कार्यरत असणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांचे अभिनंदन करून भविष्यात राज्यामधील दुष्काळी भागातील पाणी विषमता दूर करण्याला जलसंपदा विभाग प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. जलसंपदा विभागाचे अधिकारी धरणाच्याच ठिकाणी कार्यरत राहतील याचे नियोजन सुरू असल्याचेही ते म्हणाले. याप्रसंगी मंत्री विखे पाटील यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा दिला.

पालकमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, या विभागाने काळमवाडी धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्याच्या अस्तरीकरणाला मान्यता देऊन या धरणाच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या (सुप्रमा) अनुषंगाने त्वरीत येथील कामकाजाला प्रारंभ करण्यात यावा. कोल्हापूर शहरातील ब्ल्यू व रेड लाईनबाबत ठोस असा निर्णय व्हावा.

# जाहिरातींमुळे बेस्टला दिलासा; दोन वर्षांत ११४ कोटींची कमाई

● मुंबई, विशाल कारंडे :

बेस्ट उपक्रमाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी बेस्ट उपक्रमाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यात बस डेपो आणि बस स्थानकावरील जाहिरातीतून मिळणारे उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन ठरत आहे. गेल्या दोन वर्षांत २०२४-२५ मध्ये बस डेपो व बसस्थानक तसेच बसेसवरील जाहिरातून ५८.६१ कोटी, तर वर्ष २०२५-२६ मध्ये ५५.५२ कोटी महसूल प्राप्त झाला आहे.



या दोन्ही आर्थिक वर्षांत मिळून बेस्टला एकूण ११४.१३ कोटींचे जाहिरात उत्पन्न मिळाले आहे.

गेल्या काही वर्षांत बेस्ट उपक्रमाची आर्थिक स्थिती खालावली आहे. बेस्ट उपक्रमाची आर्थिक स्थितीत सुधारणा व्हावी, यासाठी मुंबई महापालिकेने जानेवारी २०१२-१३ पासून जून २०२६ पर्यंत तब्बल १३ हजार कोटींची आर्थिक मदत केली आहे. मात्र बेस्ट उपक्रमाने आर्थिक मदतीचे काय केले, याचा हिशोब न दिल्याने पालिकेने नाराजी व्यक्त करत उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करण्याची सूचना केली. त्यानंतर बेस्ट उपक्रमाने महसूल वाढीसाठी प्रयत्न सुरू केल्याचे बेस्ट उपक्रमा कडून सांगण्यात आले.प्रवासी वाहतूक, कर्मचारी वेतन, इंधन खर्च आणि बसताफ्याच्या देखभालीमुळे बेस्टवर मोठा आर्थिक ताण आहे.

# सुविधांचा अभाव आणि नाईलाज; नाशिकमध्ये पावसात मुलीवर भुईडाग

● नाशिक, सचिन कदम :

जिल्हा परिसरात सातत्याने पावसाच्या कोसळधारा सुरू असल्याने अनेक ठिकाणी गावांचा संपर्क तुटला आहे. विद्यार्थी, नोकरदार आणि स्थानिक नागरिकांचे हाल होत असून, अशा परिस्थितीत जगायचे कसे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. आदिवासीबहुल सुरगाणा तालुक्यात डोंगरपायथ्याशी वसलेल्या गावांना वेगळ्याच अडचणींना सामोरे जावे लागत आहे. सुरगाणा तालुक्यातील



केम डोंगराच्या पायथ्याशी वसलेल्या पंगारबारी गावात स्मशानभूमीचा प्रश्न रखडल्याने मुसळधार पावसात भुईडाग देऊन अंत्यसंस्कार करण्याची वेळ नातेवाईकांसह ग्रामस्थांवर आली.


मागील काही दिवसांपासून जिल्ह्यात पेठ, सुरगाणा, त्र्यंबकेश्वरसह नाशिकमध्ये मुसळधार पाऊस सुरू आहे. सतत पडणाऱ्या पावसामुळे धरणसाठ्यात वाढ होत असताना नद्यांच्या पाण्याची पातळी धोक्याच्या इशाऱ्यापर्यंत पोहोचली आहे. दुसरीकडे, सतत पडणाऱ्या पावसामुळे रस्ते पाण्याखाली गेल्याने गावकऱ्यांचा इतर गावांशी संपर्क तुटला आहे. ठिकठिकाणी दोन दिवसांहून अधिक काळ विजेचा लपंडाव सुरू असून, घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

अशा वातावरणात सुरगाणा तालुक्यातील केम डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या पंगारबारी गावातील स्मशानभूमीचे काम रखडले आहे. शनिवारी या गावातील १६ वर्षीय खुशी कांतीलाल पिठे हिचे अल्पशा आजाराने निधन झाले. मात्र, गावातील स्मशानभूमीचे बांधकाम गेल्या वर्षभरापासून अपूर्ण असल्याने आणि मुसळधार पावसामुळे अंत्यसंस्कार करताना ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला.

# पावसाबरोबर डेंग्यूचा प्रादुर्भाव वाढला

● पुणे, अभिजित येरल्लू :

पावसाने जोर धरताच शहरात डेंग्यूचाही प्रादुर्भाव वेगाने वाढू लागल्याचे महापालिकेच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. अवघ्या दीड महिन्यांत ३०० संशयित डेंग्यूचे रुग्ण आढळले आहेत. एक जानेवारी ते १५ जुलै २०२६ या कालावधीत शहरात ४७३ संशयित डेंग्यूरुग्णांची नोंद झाली असून, त्यापैकी १७५ रुग्ण जूनमध्ये, तर जुलैच्या पहिल्या पंधरवड्यात १२५ रुग्ण आढळले आहेत. वारजे, कर्वेनगर, कोथरूड या भागात सर्वाधिक डेंग्यूरुग्णांची संख्या आहे.डेंग्यूरुग्णांच्या महिनानिहाय आकडेवारीवर



नजर टाकल्यास जानेवारीत २५, फेब्रुवारीत २३, मार्चमध्ये २६, एप्रिलमध्ये ४१ आणि मे महिन्यात डेंग्यूचे ५८ संशयित रुग्ण आढळले. मात्र, जूनमध्ये ही संख्या थेट १७५ वर पोहोचली. विशेष म्हणजे जुलै महिन्याच्या केवळ १५ दिवसांत १२५ संशयित रुग्णांची भर पडली आहे. हा वाढीचा वेग कायम राहिल्यास पुढील काही आठवड्यांत डेंग्यूचा प्रादुर्भाव आणखी वाढण्याची शक्यता आरोग्य विभागाकडून व्यक्त केली जात आहे.

## पुण्यात रुग्णसंख्येत झपाट्याने वाढ

प्रभागनिहाय आकडेवारीत वारजे-कार्वेनगर (४६) हा भाग संशयित रुग्णांसह आघाडीवर आहे. त्या पाठोपाठ कोथरूड (४५), नगर रोड-वडगावशेरी (४४), औंध-बाणेर (४३) आणि धनकवडी-सहकारनगर (४२) या भागांमध्येही रुग्णसंख्या चिंताजनक आहे. कोंढवा-येवलेवाडी (३२), कसबा-विश्रामबागवाडा (३०) आणि येरवडा-कळस-धानोरी (२८) या भागांतही डेंग्यूचा प्रभाव दिसत आहे. तुलनेने केशवनगर (८) आणि बिबवेवाडी (११) येथे संशयित रुग्णांची संख्या कमी आहे.साचणाऱ्या पाण्यामुळे डेंग्यूचा धोका पावसामुळे विविध ठिकाणी साचणारे पाणी, त्यातून होणारी डासांची पैदास आणि बदलते हवामान यामुळे डेंग्यूचा धोका अधिक वाढत असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. घराच्या तसेच परिसराच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष देणे, पाणी साचू न देणे, डासांपासून संरक्षण करणारे उपाय करणे आणि ताप, अंगदुखी, डोळ्यांच्या मागे वेदना किंवा तीव्र अशक्तपणा यांसारखी लक्षणे आढळल्यास तातडीने वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले.